cmyk

दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-१२८ | गुरुवार दि.२९ ऑगस्ट २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने- ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### साथरोगांचे सावट

सध्या सणासुदीचे दिवस आहेत. त्यातच पावसाचे प्रमाण कमी-अधिक होत असल्याने साथरोगांची चलती सुरू झाली आहे. राज्यात गत पाच-सहा दिवसांपासून सुरू असलेला पावसाचा जोर कमी होईल असा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. किनारपट्टी, घाटमाथ्यावर मात्र हलक्या सरींची शक्यता आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार पूर्व राजस्थानवर असलेले हवेचे कमी दाबाचे क्षेत्र गुजरातमधील सौराष्ट्र आणि कच्छच्या दिशेने वाटचाल करून उत्तर अरबी समुद्रात प्रवेश करण्याची शक्यता आहे.

## सुरेश कुटे यांची भाजपातून हकालपट्टी

बीड-ज्ञानराधा मल्टीस्टेटमध्ये जवळपास साडेचार हजार कोटी रुपयांच्या जनतेच्या ठेवी बुडवणाऱ्या सुरेश कुटे आणि अर्चना कुटे यांची भाजपातून हकालपट्टी करण्यात आली आहे. सुरेश कुटे हे जेलमध्ये आहेत, तर अर्चना कुटे या फरार आहे. काही महिन्यापुर्वी भाजपात प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनखुळे यांच्या उपस्थितीत प्रवेश केला होता. जनतेचा पैसा बुडवला असतानाही कुटे दाम्पत्याला भाजपने प्रवेश कसा दिला असा सवाल काही दिवसापुर्वी संभाजीनगर येथील एका ठेवीदाराने किरीट सोमय्या यांना फोन करुन विचारला होता. त्यानंतर भाजपने कुटे यांची हाकालपट्टी केली आहे.

# शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी ते सोयाबीन, कापूस दर

## सदाभाऊ खोत यांच्या रयत क्रांती संघटनेच्या बैठकीत महत्वाचे ठराव



**पुणे । प्रतिनिधी**

रयत क्रांती संघटनेची राज्यव्यापी कार्यकारणी संस्थापक अध्यक्ष सदाभाऊ खोत यांच्या नेतृत्वाखाली पुणे येथे पार पडली. या बैठकीत विविध विषयांवरील महत्वाचे ठराव करण्यात आले आहेत. यामध्ये शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफीसह सोयाबीन आणि कापसाच्या हमीभावाचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. आगामी काळात या मुद्द्यावर संघटना काम करणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

रयत क्रांती संघटनेची राज्यव्यापी कार्यकारणी संस्थापक अध्यक्ष सदाभाऊ खोत यांच्या नेतृत्वाखाली आज पुणे येथे पार पडली. या बैठकीस राज्यभरातील विभागीय अध्यक्ष, जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष व प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. ◀◀ पान २ वर

### बैठकीत झालेले महत्त्वाचे ठराव

शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करण्यात यावी. साखरेचा हमीभाव ३८ रुपये करण्यात यावा. शासनाकडून सोयाबीनला उत्पादन खर्चावर आधारित ७ हजार आणि कापसाला १० हजार हमीभाव देण्यात यावा. सन २०२३-२४ चा पिक विमा देण्यात यावा. शेतकऱ्यांचे राष्ट्रीयकृत बँकेकडून तपासण्यात येणारे सिबिल (कर्ज पात्रता) रद्द करण्यात यावे. कांद्यावरील निर्यात शुल्क काढण्यात यावे. शेतमालावरील निर्यात बंदी कायमस्वरूपी उठावण्यात यावी.

# अजित पवारांच्या भाषणावेळी राडा

## मराठा आंदोलक आक्रमक; पोलिसांचा सौम्य लाठीचार्ज

**हिंगोली । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या जनसन्मान यात्रेदरम्यान लातूरच्या सभेवेळी गोंधळ झाला. अजित पवार यांचे भाषण सुरू असताना स्टेजवर काही मराठा आंदोलक आले आणि त्यांनी अजित यांना भूमिका स्पष्ट करायला सांगितले. त्यांनतर बराच वेळ गोंधळ झाल्याने पोलिसांना सौम्य लाठीचार्ज करावा लागला. हिंगोलीच्या वसमतच्या सभेवेळी हा राडा झाला.

वसमतमध्ये अजित पवार यांच्या नेतृत्वात जन सन्मान यात्रा आयोजित करण्यात आली होती. ◀◀ पान २ वर

# ॲड.सुभाष राऊतांकडे राज्य मंत्री दर्जाचे पद

## राज्य अन्न आयोगाच्या अध्यक्षपदाची सुत्रे सोपवली



### गरीबांना दोन घास मिळवून देण्याची जबाबदारी

राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष ॲड. सुभाष राऊत यांना राज्य मंत्र्यांचा दर्जा असून यापुढे ते राज्यातील गरीब जनतेला स्वस्त धान्य दुकानाद्वारे धान्य मिळते का? यावर नियंत्रण ठेवले जावू शकते. अंत्योदय योजनेसह इतर शासनाच्या रेशनच्या योजना राज्यात प्रभावीपणे राबवल्या जातात की नाही, याची पाहणी करुन वेळप्रसंगी कारवाई करण्याची भुमिका घेणे. यासह राज्य शासनाला वेळोवेळी गरीबांना अन्नधान्य मिळवून देण्यासाठी विनंती व सुचना करणे, अशा स्वरुपाच्या जबाबदाऱ्या असू शकतील.

**बीड । प्रतिनिधी**

**मंत्री छगन भुजबळ यांचे अत्यंत विश्वासू व समता परिषदेचा राज्य उपाध्यक्ष ॲड. सुभाष राऊत यांच्याकडे राज्य अन्न आयोगाच्या अध्यक्षपदाचे सुत्रे सोपवण्यात आली आहेत. राज्य मंत्री पदाचा दर्जा असलेल्या राज्य अन्न आयोगाच्या अध्यक्षपदाचा अतिरिक्त पदभार ॲड. राऊत यांच्याकडे सोपवल्यामुळे बीड जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.**

समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष ॲड. सुभाष राऊत यांनी ओबीसी समाजासह विद्यार्थ्यांसाठी ◀◀ पान २ वर

# दादा, तुम्ही फक्त लढ म्हणा..!

## डॉ.योगेश क्षीरसागर बीड मतदार संघात भाकरी फिरवणार



### कामाची पध्दत सामान्यांना आकर्षित करणारी

राजकीय नेते म्हटले की झगमगाट आणि हायटेक वागणं आलच. अशा नेत्यांना जनताही ओळखून असते. डॉ. योगेश क्षीरसागर आणि डॉ. सारिकाताई क्षीरसागर यांची काम करण्याची पध्दत ही सामान्य नागरीकांना आकर्षित करणारी आहे. मतदार संघात गाठीभेटी घेताना प्रत्येक नागरीकांच्या समस्या जाणून घेत त्यांना धीर देण्याचे काम त्यांच्याकडून केले जाते. त्यामुळे दिवसेंदिवस कार्यकर्ते त्यांच्याशी जोडले जात आहेत.

**बीड । विशेष प्रतिनिधी**

**राजकारण कसे केले जाते, कार्यकर्ता कसा जोडला जातो, पक्ष गावागावात नव्हे तर घराघरात कसा पोहचेल हे लोकसभा निवडणुकीत डॉक्टर असलेल्या क्षीरसागर दाम्पत्यांनी दाखवून दिले आहे. बीड विधानसभा मतदार संघात सक्षम उमेदवार म्हणून डॉ. योगेश क्षीरसागर हे सध्या पुढे आले आहेत. त्यामुळे दादा, तुम्ही फक्त लढ म्हणा, आम्ही राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचा बीडचा आमदार करुन दाखवून देऊ, असा नारा आता बीड मतदार संघातील कार्यकर्ते देऊ लागले आहेत. त्यामुळे ही बीडची जागा अजितदादांनी आपल्या पक्षाकडे घेऊन डॉ. क्षीरसागर यांना उमेदवारी दिली तर मतदार बीडमध्ये भाकरी फिरवणार असल्याचे संकेत आहेत.**

महायुतीमध्ये सध्या उमेदवारीवरुन जोरदार रस्सीखेच सुरु आहे. बीड विधानसभा मतदारसंघ ◀◀ पान २ वर

### अजितदादांच्या सभेस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे-डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर



बीड: राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली राज्यभरात सुरू असलेली जनसन्मान यात्रा बीडमध्ये आज (दि.२९) सकाळी ९.३० वाजता येत आहे. या यात्रेनिमित्ताने शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगणावर भव्यसभा होणार आहे. या यात्रेच्या स्वागतासह सभेसाठी कार्यकर्त्यांसह नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी केले आहे. जनसन्मान यात्रेचे नियोजन पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते तथा पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून ना.अजितदादा पवार यांच्यासमवेत राष्ट्रीय कार्याध्यक्ष ◀◀ पान २ वर

# कुंडलिक खांडेंना जामीन मंजूर

## उच्च न्यायालयाने टाकली एक महत्वाची अट



**बीड । प्रतिनिधी**

शिवसेना उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर खांडे यांच्यावरील हल्ला प्रकरणात दोन महिन्यापासून जेलमध्ये असलेल्या शिवसेना जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांना अखेर उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठाने बुधवारी जामीन मंजूर केला आहे. मात्र जामीन देताना उच्च न्यायलयाने एक महत्वाची अट टाकली आहे.

लोकसभा निवडणुकीत पंकजा मुंडे यांना कसा धोका दिला याबाबतची ऑडिओ क्लिप समोर आल्यावर काही दिवसातच कुंडलिक खांडे यांना उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर खांडे यांच्यावरील हल्ला प्रकरणात अटक करण्यात ◀◀ पान २ वर

# नितीन गडकरींनी मैदानात उतरावे

## विधानसभेसाठी सक्रिय भूमिका बजावावी, संघ आग्रही



**नागपूर । प्रतिनिधी**

सध्याची राजकीय स्थिती आणि भाजपसमोर निर्माण झालेलं राजकीय आव्हान बघता केंद्रीय रस्ते आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरींनी आता विधानसभा प्रचारात काही अंशी अधिक भूमिका बजावावी अशी आग्रही मागणी केल्याची माहिती आहे. गडकरींचा विकासात्मक आणि तुलनेत मवाळ चेहरा तसेच मंत्री म्हणून केलेल्या कामासंदर्भात राज्यातल्या जनतेच्या मनात त्यांची प्रतिमा पाहता गडकरी हे महाराष्ट्र भाजपच्या मदतीचे ठरतील असे संघाला वाटत आहे. दरम्यान या संदर्भात भाजपकडून अजून अंतिम निर्णय झालेला नाही.

केंद्रातल्या मोदी सरकारमधील ज्या काही मोजक्या मंत्र्यानी स्वतःची वेगळी छाप सोडली आहे. नितीन गडकरी जे फक्त स्वतःच्या महाराष्ट्र राज्यापुरतं लोकप्रिय नाहीत, तर ज्यांची लोकप्रियता महाराष्ट्राच्या बाहेर आणि पक्षीय पातळीच्यावर आहे. त्याच नितीन गडकरी यांनी यंदा महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकांच्या ◀◀ पान २ वर




# भाजपचे केंद्रीय नेतृत्व राज्य सरकारवर नाराज

## वायफळ मंत्री अन् नेत्यांमुळे महायुतीला फटका

**मुंबई । प्रतिनिधी**

मालवणमधील शिवरायांचा पुतळा कोसळल्या प्रकरणी एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाची राज्य सरकारवर नाराजी असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. राज्य सरकारने प्रकरण गांभीर्याने हाताळायला हवे, अशी भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाची भूमिका असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. शिवरायांच्या पुतळ्याची योग्य देखभाल घ्यायला हवी होती, असे भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाचे मत असल्याची माहिती समोर येत आहे.



सिंधुदुर्गात मालवण येथील राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी ◀◀ पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२६ ऑगस्ट २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू :६.५० क्विंटल | २,६१७ | २,६३० | २,६२३ |
| ज्वारी/हायब्रिड: ७५.०० क्विंटल | १,८०० | २,९०० | २,२३८ |
| मूग : ३५.५० क्विंटल | ६,८०० | ७,६०० | ७,३३३ |
| तूर : १७.५० क्विंटल | ९,९३१ | ९,९३१ | ९,९३१ |
| उडीद : २.५० क्विंटल | ४,९०१ | ७,४०० | ६,१५० |
| बाजरी: ४८.५० क्विंटल | २,१५० | २,९८५ | २,५९७ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: ३२.५० क्विंटल | ४,१०० | ४,२५० | ४,१८५ |
| हरभरा: १.५० क्विंटल | ५,५०० | ५,५०० | ५,५०० |







cmyk

## अग्रलेख

# साथरोगांचे सावट

सध्या सणासुदीचे दिवस आहेत. त्यातच पावसाचे प्रमाण कमी-अधिक होत असल्याने साथरोगांची चलती सुरू झाली आहे. राज्यात गत पाच-सहा दिवसांपासून सुरू असलेला पावसाचा जोर कमी होईल असा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. किनारपट्टी, घाटमाथ्यावर मात्र हलक्या सरींची शक्यता आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार पूर्व राजस्थानवर असलेले हवेचे कमी दाबाचे क्षेत्र गुजरातमधील सौराष्ट्र आणि कच्छच्या दिशेने वाटचाल करून उत्तर अरबी समुद्रात प्रवेश करण्याची शक्यता आहे. मध्य प्रदेशवरून कमी दाबाचे क्षेत्र पुढे निघून गेल्याने उत्तर महाराष्ट्रातील पाऊस कमी झाला आहे. बंगालच्या खाडीत आणखी एक कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाले आहे. त्याची वाटचाल मध्य प्रदेशच्या दिशेने होण्याची शक्यता आहे. तसे झाल्यास विदर्भात पुन्हा पाऊस सक्रिय होऊ शकतो. पावसाळ्यात साथरोगांची चलती असते.

सध्या राज्यावर चिकुनगुनियाचे सावट आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदा चिकुनगुनियाची रुग्णसंख्या तिपटीने वाढली आहे. राज्यात गतवर्षी १ जानेवारी ते १४ ऑगस्ट दरम्यान चिकुनगुनियाचे ४९७ रुग्ण आढळले होते. यंदा याच काळात १ हजार ७४४ रुग्ण आढळले आहेत. सर्वाधिक रुग्ण नागपुरात २२८, कोल्हापूर जिल्ह्यात १७५, पुणे १३९, अकोला ९४ तर बीडमध्ये ७४ रुग्ण आढळले आहेत. पावसाळा सुरू झाला की डेंग्यू, मलेरिया, चिकुनगुनिया अशा कीटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव होतो. हवामान, साचलेले पाणी, हवेतील आर्द्रता अशी पोषक स्थिती निर्माण झाली की डासोत्पत्तीचे प्रमाण वाढते. शहरी भागातील वातावरणामध्ये दिवसेंदिवस आर्द्रतेचे प्रमाण वाढत आहे. प्रदूषणही वाढले आहे. त्यामुळे ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरांमध्ये आजारांचे प्रमाण वाढत आहे.

अशास्त्रीय पद्धतीने होणारे शहरीकरण, योग्य नियोजन आणि व्यवस्थापनाचा अभाव यामुळे शहरांमध्ये डासांना पोषक वातावरण निर्माण होत आहे. शहरातील लोकसंख्या झपाट्याने वाढत असून शहराचे विद्रुपीकरण होत आहे. वस्त्यांमधील गर्दी, अनधिकृत बांधकामे यामुळे अशास्त्रीय पद्धतीने वसाहती वाढत आहेत. शहराचा पसारा वाढत असताना नियोजनाचा आणि व्यवस्थापनाचा मात्र अभाव आहे. त्यामुळे एक-दोन पावसातच मुख्य रस्त्यांवर, इमारतींच्या पार्किंगमध्ये पाणी साचते. पावसाचे पाणी वाहून जायला जागाच उरत नाही. त्यामुळे डासांची पैदास वाढते. मुंबईत मुसळधार पावसानंतर अनेक आजारांनी थैमान घातले आहे. मलेरिया, डेंग्यू, चिकुनगुनिया, गॅस्ट्रो आणि एच१एन१ सारख्या आजारांना लोक बळी पडत आहेत. या आजाराच्या रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत आहे. गतवर्षी मलेरियाचे ५५५ रुग्ण आढळले होते. यंदा ती संख्या १ हजार ८० वर पोहोचली आहे.

डेंग्यूची रुग्णसंख्या ५६२ तर चिकुनगुनियाचे ८४ रुग्ण आहेत. गॅस्ट्रोचे ५३४ तर हिपॅटायटीसचे ७२ रुग्ण आढळले आहेत. मुंबईत यंदा ऑगस्टच्या सुरुवातीला चांगला पाऊस झाला, त्यामुळे रुग्णांची संख्या वाढत आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदा मुंबईकरांना पावसाळ्यातील आजारांचा अधिक फटका बसला आहे. पावसाळ्यातील हवेत आर्द्रतेचे प्रमाण अधिक असल्याने त्याचा लहान मुलांच्या आरोग्यावर परिणाम होतो. त्यामुळे पावसाळा सुरू झाल्यापासून मुले आजारी पडण्याचे प्रमाण वाढले आहे. प्रामुख्याने सर्दी आणि तापाच्या तक्रारी अधिक दिसून येत आहेत. पावसाळ्यात मुलांना सर्दी, जुलाब आणि त्वचाविकारांचा सर्वाधिक त्रास होतो. याशिवाय मुलांमध्ये डोकेदुखी, ताप, बद्धकोष्ठता, भूक न लागणे अशी अनेक लक्षणे दिसतात. डेंग्यू, हिवताप आणि चिकुनगुनियाचे रुग्ण पावसाळ्यात अधिक दिसतात. ही लक्षणे लहान मुलांमध्ये दिसल्यास पालकांनी दुर्लक्ष न करता वेळीच डॉक्टरांचा सल्ला घ्यायला हवा.

पावसाळ्यात डास आणि माश्या वाढतात. माश्या अन्नावर बसतात तेव्हा अन्नातूनही अनेक रोग पसरतात. पावसाळ्यातील ओलाव्यामुळे विषाणू आणि जिवाणू वाढतात. त्यामुळे फ्लू, दमा, अ‍ॅलर्जी होण्याची शक्यता असते. पालकांनी मुलांना अस्वच्छ पाण्यात खेळू देऊ नये. तसेच घराभोवती पावसाचे पाणी साचणार नाही याची काळजी घ्यायला हवी. पावसाळ्यात पिण्याच्या पाण्यातून जलजन्य आजारांचा प्रसार होण्याचा धोका असतो. त्यामुळे पिण्याचे पाणी उकळून पिणे केव्हाही चांगले. बदलत्या हवामानामुळे अहमदनगर जिल्ह्यात रुग्णांचे प्रमाण वाढले आहे. सतत पावसाची रिपरिप वाढल्याने सर्दी व हिवतापाचे रुग्ण वाढले आहेत. पारनेर, नगर तालुक्यातही चिकुनगुनियाचे रुग्ण वाढले आहेत. या आजारांना आळा घालण्यासाठी नागरिकांनी आठवड्यातून किमान एक दिवस कोरडा दिन पाळायला हवा. शिवाय तणनाशक, मच्छर औषध फवारणी, धूर फवारणी करणे आवश्यक आहे. पाऊस, साचलेले पाणी, कचरा यामुळे नागपुरात डेंग्यू, चिकुनगुनिया याने डोके वर काढले आहे. योग्य ती खबरदारी न घेतल्यास हे आजार गंभीर, घातक ठरू शकतात. पाणी साठवून ठेवणे, प्लास्टिक कप, टायरमध्ये पाणी साचून राहिले तर मोठ्या प्रमाणात डासांची पैदास होते.

त्यामुळे डेंग्यू, मलेरियाचा धोका वाढतो. तसेच एका नागरिकाचे एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी कामास जाणे, पर्यटनासाठी अथवा इतर बाबींसाठी एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी करण्यात येणा-या प्रवासामुळेही या आजाराचा फैलाव होतो. बाहेरचे खाद्यपदार्थ खाल्ल्याने तसेच स्वच्छतेच्या अभावामुळे गॅस्ट्रो, टायफॉईडचे रुग्ण मे महिन्यापासूनच दिसू लागतात. पावसाळ्यात पाणी दूषित होण्याची शक्यता अधिक असते. हे पाणी पिल्याने जुलाब, उलटी, टायफॉईड, गॅस्ट्रोसारखे आजार होण्याची भीती असते. त्यामुळे लहान मुले, गरोदर माता, वृद्धांनी विशेष काळजी घेण्याची गरज आहे. ज्या शहरांना पुराचा फटका बसला तेथे साचलेले पुराचे पाणी काढून टाकण्यासाठी संबंधित महापालिकांनी स्वच्छता मोहीम सुरू केली आहे. तशी कोणतीही व्यवस्था पूर आलेल्या ग्रामीण भागात नसल्याने तेथून मोठ्या प्रमाणावर साथीच्या आजारांचा गंभीर धोका उद्भवू शकतो. शहर आणि ग्रामीण भाग यातील सीमारेषा इतकी पुसट आहे की, या भागातून आजाराचे प्रमाण वाढल्यास त्याचा शहरी भागालाही फटका बसू शकतो. म्हणून वेळीच खबरदारी घ्यायला हवी.

## निवडणुकीच्या आधी ५ सहकारी साखर कारखान्यांना पहिला हप्ता, ४८७ कोटी रक्कम जमा

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील ५ सहकारी साखर कारखान्याच्या खात्यावर कडून मंजूर झालेली ५९४ कोटी रुपयांपैकी ४८७ कोटी रक्कम खात्यावर जमा झाली आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर साखर कारखानदारांना मोठा दिलासा मिळाला आहे. राज्यातील एकूण ११ सहकारी साखर कारखान्यांना १५९०.१६ कोटी रुपयांची थकहमी देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यापैकी ५ कारखान्यांच्या खात्यावर रक्कम जमा करण्यात आली असून उर्वरित कारखान्यांच्या खात्यावर लवकरच रक्कम जमा करण्यात येणार असल्याची माहिती आहे.**

पुणे जिल्ह्यातील शिरूर मतदारसंघाचे आमदार अशोकबापू पवार यांच्या घोडगंगा सहकारी साखर कारखान्याच्या संदर्भात दोन दिवसापूर्वी मुंबई हायकोर्टाने दिलेल्या आदेशाप्रमाणे एनसीडीसीकडून मंजूर असलेल्या ५९४ कोटी रुपयांपैकी १०७ कोटी रुपये रक्कम राज्य सरकारने राखीव ठेवली आहे. यासंदर्भातली पुढील सुनावणी १९ सप्टेंबर रोजी होणार आहे. त्यानंतर या रकमेचा निर्णय घेण्यात येईल. राज्यातील ११ कारखान्यांना मदत राज्यातील ११ कारखान्यांना १५९० कोटी १६ लाखांची थकहमी देण्यात येणार आहे. पहिल्या यादित १३ कारखान्यांना १८९८ कोटी रुपयांची थकहमी देण्याचा निर्णय घेतला होता. मात्र नव्याने आदेश काढत ११ कारखान्यांना १५९०.१६ कोटी रुपयांची थकहमी देण्याचा शासन आदेश प्रसिद्ध करण्यात आला. एनसीडीसीने थकहमी दिलेले कारखाने (रक्कम कोटीत) - लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखाना (धारूर, बीड) : ९७.७६ कोटी, श्री संत दामाजी सहकारी साखर कारखाना, मंगळवेढा : ९४ कोटी, वृधेश्वर सहकारी साखर कारखाना , पाथर्डी : ९३ कोटी, लोकनेते मारुतीराव घुले पाटील सहकारी साखर कारखाना , नेवासा : १४० कोटी, किसनवीर सातारा सहकारी साखर कारखाना, वाई : ३२७ कोटी, किसनवीर खंडाळा सहकारी साखर कारखाना, खंडाळा : १५० कोटी, अगस्ती सहकारी साखर कारखाना, अकोले : ९४ कोटी, श्री तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी साखर कारखाना, वारणानगर : ३२७ कोटी, श्री विठ्ठलसाई सहकारी साखर कारखाना, उमरगा : ९४, अंबेजोगाई सहकारी साखर कारखाना, अंबेजोगाई : ८० कोटी, सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखाना, श्रीगोंदा : १०३. ४० कोटी.

## उक्कडगाव येथे उत्तरेश्वर महादेव मंदिर येथे महाप्रसाद

गेवराई । प्रतिनिधी

श्रीक्षेत्र उक्कडगाव येथे उत्तरेश्वर महादेव मंदिर येथे श्रावण सोमवार चौथा निमित्त महाप्रसाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता यावेळी गेवराई तालुक्याचे लोकप्रिय कार्यसम्राट आमदार लक्ष्मणआण्णा पवार तसेच युवानेते शिवराजदादापवार,यांनी उपस्थिती दर्शवली व उत्तरेश्वर महादेवाचे मनो भावे दर्शन घेतले,गोपत पिंपळगाव उक्कडगाव गोदावरी नदीवर सुरु असलेल्या ब्रिज पुलाचे काम प्रगती पथावर आहे या लक्ष्मण सेतुचे जनक कार्यसम्राट आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांचा गावकऱ्यांच्या वतीने सत्कार स्वागत करण्यात आले यावेळी कार्यसम्राट आमदार लक्ष्मणआण्णापवार साहेब यांचे मोठे मेव्हणे आदरणीय कल्याणराव तौर ठाकूर जोगेश्वरी उद्योगसमूह,यांच्यासह घनसावंगी चे युवानेते विजय(दादा)खरात,युवा उद्योजक शैलराज(भैय्या) तौर,उपस्थित होते युवा नेते शिवराजदादापवार यांनी पुलाच्या कामाची पाहणी केली व गोदावरी नदीची नारळानी ओटी भरवली कामाची पहाणी केली त्यावेळी डॉ.मोटे,गोपाल (भैय्या)चव्हाण, समाधान(जीजा)मस्के, अमोल मस्के,गोरख मोटे,अशोक तौर,सुदाम आर्दड,योगेश तौर,पिराजी तौर,बाबासाहेब तौर,रामराजे तौर,संतोष मस्के,लक्ष्मण बिडवे,बबन जाधव,संजय उनवने,स्वियं सहाय्यक प्रा.प्रल्हाद येळापुरे,विजय सुरनर,आप्पा कापसे,सजय तौर,दादा चव्हाण,बंडु काका तौर,आदी उपस्थित होते.

## राजकोट किल्ल्यावर राजकीय राडा

मालवण । प्रतिनिधी

**नारायण राणे आणि ठाकरेंच्या समर्थकांमध्ये राडा झाला. शिवरायांचा पुतळा कोसळल्यानंतर राणे आणि आदित्य ठाकरेही राजकोट किल्ल्यावर आले. दोघांच्या समर्थकांकडून आधी घोषणाबाजी आणि नंतर राडा झाला. तर राणेंनी घरात खेचून एकएकाला मारुन टाकेन, अशी धमकीच दिली.**

छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्यानंतर राणे पिता पुत्र आणि आदित्य ठाकरेंसह महाविकास आघाडीचे नेते मालवणच्या राजकोट किल्ल्यावर आहे. एकाच वेळी आमनेसामने आल्याने इथूनच राडयाची सुरुवात झाली. पोलिसांनी राणे समर्थकांना रोखून आदित्य ठाकरे आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांना पाहणी करण्यास वाट मोकळी करुन दिली. पाहणी झाल्यानंतर आदित्य ठाकरेंना किल्ल्याच्या मागच्या बाजूनं बाहेर काढा. किल्ल्याच्या मुख्य प्रवेशाद्वारातून जाऊ देणार नाही, अशी भूमिका निलेश राणेंनी घेतली आणि पुन्हा तणाव निर्माण झाला तर आदित्य ठाकरेंनीही २ तास किल्ल्यातच ठिय्या मांडला. इकडे राडा एवढा टोकाला पोहोचला की महाराजांच्या किल्ल्याच्या परिसरात ठाकरे आणि भाजपचे कार्यकर्ते आमनेसामने आले. एकमेकांच्या दिशेनं लाकडंही भिरकावण्यात आली. तर निलेश राणेंनीही पोलिसांसोबत बाचाबाची करत अरेरावीची भाषा केली. मध्यस्थी करण्यासाठी पोलिस अधिकाऱ्यांसह जयंत पाटीलही पुढे सरकारवले आणि काही वेळानंतर, अखेर पोलिसांनी नारायण राणे, निलेश राणेंसह कार्यकर्त्यांना रोखले आणि मुख्य मार्गानेच आदित्य ठाकरे आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांना किल्ल्याच्या बाहेर काढले.

## आता बस्स झाले मी निराश आणि भयभीत राष्ट्रपती द्रौपदी मूर्म यांचे सर्वात मोठे विधान

नवी दिल्ली । वृतसंस्था

**मी निराश आणि भयभीत आहे, असं द्रौपदी मुर्मू म्हणाल्या आहेत. या घटनेमुळे देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या देखील सुन्न झाल्या आहेत. बस आता खूप झाले. मी पण निराश आणि भयभीत आहे. मुलींच्या बाबत गुन्हे घडत आहेत ते आता सहन होणारे नाहीत. आतापर्यंत जे झालं ते भरपूर झाले. समाजाला आत्मचिंतन करण्याची गरज आहे. प्रामाणिकपणे आणि नि:पक्षपणे आत्मचिंतन गरजेचे आहे, अशी भूमिका राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मांडली.**

भारतात गेल्या काही दिवसांपासून महिला अत्याचाराच्या घटनांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. काही महिन्यांपूर्वी मणिपूरमध्ये एका महिलेची आणि तिच्या तरुण मुलीची नग्न धिंड काढण्यात आल्याचा संतापजनक प्रकार समोर आला होता. या घटनेमुळे आपला समाज आता कोणत्या दिशेला चालला आहे? असा प्रश्न उपस्थित करण्यात येत होता. या घटनेनंतरही महिला अत्याचाराच्या घटना कमी झाल्या नाहीत. नुकतंच काही दिवसांपूर्वी कोलकातामध्ये एका रुग्णालयात एका महिला डॉक्टरावर पाशवी अत्याचार करण्यात आले. या घटनेत आरोपीने पीडित डॉक्टराची अतिशय अमानवीय पद्धतीने हत्या केली. त्यापेक्षा जास्त भयानक हे होतं की, रुग्णालय प्रशासनाने सुरुवातीला पीडिताने आत्महत्या केल्याचा दावा केला. यानंतर विद्यार्थी, रुग्णालयाचा स्टाफ रस्त्यावर आला तेव्हा हे प्रकरण उजेडात आलं. या घटनेमुळे अख्खा देश हादरला आहे. या घटनेचा मानसिक परिणाम देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या मनावरही खोलवर पडला आहे. द्रौपदी मुर्मू या देशाच्या राष्ट्रपती असल्या तरीही राष्ट्रपतीपदाच्या पलिकडे त्यांच्यात एक माणूस आहे. त्यामुळे द्रौपदी मुर्मू यांनी कोलकाताच्या घटनेवर संताप व्यक्त केला आहे. देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी कोलकाता येथील रुग्णालयात महिला डॉक्टरावर बलात्कार आणि हत्येच्या घटनेवर पहिली प्रतिक्रिया दिली आहे. द्रौपदी मुर्मू यांनी पीटीआयला मुलाखत दिली. यावेळी त्यांनी मोठं वक्तव्य केलं. कोलकाता सारख्या घटना आता बस्स झाल्या. मी निराश आणि भयभीत आहे, असं द्रौपदी मुर्मू म्हणाल्या आहेत. या घटनेमुळे देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या देखील सुन्न झाल्या आहेत. बस आता खूप झालं. मी पण निराश आणि भयभीत आहे. मुलींच्या बाबत गुन्हे घडत आहेत ते आता सहन होणारे नाहीत. आतापर्यंत जे झालं ते भरपूर झाले. समाजाला आत्मचिंतन करण्याची गरज आहे. प्रामाणिकपणे आणि नि:पक्षपणे आत्मचिंतन गरजेचे आहे, अशी भूमिका राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मांडली. विशेष म्हणजे महिला अत्याचाराच्या घटनेवर पहिल्यांदाच असे बघायला मिळत आहे की, देशाच्या राष्ट्रपतींनी प्रतिक्रिया दिली आहे. सभ्य समाज कधीच महिला आणि मुलींवर अत्याचार सहन करु शकत नाही. या घटनेनंतर कोलकातामध्ये विद्यार्थी, डॉक्टर आणि नागरिक आंदोलन करत होते, तर आरोपी कुठेतरी बाहेर फिरत होते. आता बास्स झाले. समाजाला प्रमाणिक होण्याची आणि आत्मनिरीक्षण करण्याची खूप आवश्यकता आहे, असे द्रौपदी मुर्मू म्हणाल्या.

## या कृत्यासाठी तर जन्मठेपेची शिक्षा सुद्धा कमी

### सडक छाप मजनूवर कोर्टाचा संताप, काय ठोठावली शिक्षा

मुंबई । प्रतिनिधी

**देशाची आर्थिक राजधानी मुंबईत कोर्टाने आरोपीवर संताप व्यक्त केला. एका अल्पवयीन तरुणाने तरुणीला डोळा मारला. कोर्टाने आरोपीला शिक्षा सुनावताना या कृत्यासाठी तर जन्मठेपेची शिक्षा सुद्धा कमी असल्याची टिप्पणी केली. पण आरोपीचे वय बघता कोर्टाने त्याची शिक्षा माफ केली. त्याला कोर्टाने दंड ठोठावला. अशा प्रकारच्या प्रकरणात जास्तीत जास्त ५ वर्षांपर्यंतच्या शिक्षेची तरतूद आहे. पीडितेच्या तक्रारीनंतर आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. याप्रकरणात नुकतीच सुनावणी झाली.**

#### पाच वर्षांपर्यंत शिक्षेची तरतूद

या प्रकरणात दोषी आढळल्यानंतर कोर्टाने आरोपी तरुणाचे वय पाहता, त्याला मुक्त केले. त्याला पुन्हा असा प्रकार न करण्याची सक्त ताकीद दिली. अशा प्रकरणात भारतीय कायद्यानुसार,जास्तीत जास्त पाच वर्षांच्या सश्रम तुरुंगवासाची शिक्षेची तरतूद आहे. पण यापूर्वी आरोपीविरोधात अशा कोणत्याही घटनेची तक्रार नाही. त्याच्यावर इतर कोणताही गुन्हा नाही. त्यामुळे भविष्यात अशी चूक न करण्याची ताकीद देत, न्यायालयाने त्याला सोडून दिले. पण आरोपीला १५ हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावली.

प्राप्त माहितीनुसार, आरोपीविरोधात तरुणीने पोलिसात तक्रार केली होती. आरोपी तरुणाने तिला डोळा मारला होता. तरुणीच्या तक्रारीनंतर पोलिसांनी तरुणाविरोधात गुन्हा दाखल केला. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. दोन्ही पक्षांनी त्यांची बाजू मांडली. युक्तीवादानंतर तरुणावरील आरोप सिद्ध झाले. हे प्रकरण गंभीर असल्याचे मत मांडत कोर्टाने तरुणाला जन्मठेपेची शिक्षा पण कमी असल्याचे ताशेरे ओढले. अशा प्रकारेमुळे पीडितेला मानसिक त्रास झाला आहे, याकडे कोर्ट दुर्लक्ष करु शकत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

## पान १वरून...

### अजित पवारांच्या

या निमित्ताने वसमत शहरातील मयूर मंगल कार्यालय परिसरात भव्य सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत भाषणाला आजित पवार उभे टाकताच मराठा आंदोलकांनी सभेत गोंधळ घातला आहे. एक मराठा लाख मराठा आशा घोषणांनी स्टेज परिसरात चांगलाच गोंधळ उडाला होता. मोठ्या प्रमाणात मराठा आंदोलक दाखल झाल्याने पोलिसांचा चांगलाच गोंधळ उडाला होता. मोठा राडा झाल्याने परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी पोलिसांना सौम्य लाठीचार्ज करावा लागल्याचे म्हटले जात आहे. शेवटी पोलिसांनी मध्यस्ती करत आंदोलकांना सभा स्थळापासून बाजूला नेत हे आंदोलन शमविले आहे. या ठिकाणी मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी निवेदन देण्यासाठी आम्ही आलो आहोत परंतु पोलीस बळाचा वापर करून आम्हाला निवेदन देऊ दिले जात नाही आसा आरोप आंदोलकांनी केला आहे.

**अजित पवारांनी मागितली माफी**

छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा वाऱ्यामुळे पडला. मात्र, याप्रकरणी दोषींवर कारवाई करण्यात येणार आहे. मी राज्याचा उपमुख्यमंत्री म्हणून राज्यातील तेरा कोटी लोकांची जाहीर माफी मागतो. यातील सर्व दोषी लोकांवर कडक कारवाई करण्यात येईल, असे म्हणत अजित पवार यांनी पुतळा दुर्घटनेप्रकरणी महाराष्ट्राची माफी मागितली आहे.

---------------

### शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी

सध्या रयत क्रांती संघटनेच्या आणि पक्षाच्या सर्व आघाड्या बरखास्त करण्यात आलेल्या असून ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यामध्ये आमदार सदाभाऊ खोत आणि प्रमुख पदाधिकारी यांचा राज्यव्यापी दौरा आयोजित करण्यात आलेला असून दौऱ्या दरम्यान तालुकाध्यक्ष जिल्हाध्यक्ष यांच्या निवडी करण्यात येणार आहेत आणि त्यानंतर मुंबई येथे होणारे महामेळाव्यात प्रदेशाध्यक्ष पदाची नेमणूक करण्यात येईल, असे बैठकीत ठरवण्यात आले. दरम्यान, बैठकीत महत्वाचे ठराव करण्यात आले आहेत.

----------

### दादा, तुम्ही फक्त

आपल्याकडे घेण्यासाठी राष्ट्रवादी कॉँग्रेस अजित पवार गट आणि शिवसेना शिंदे गट यांच्यात जोरदार रस्सीखेच सुरु आहे. कृषीमंत्री आणि पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी ही जागा राष्ट्रवादीकडे यावी यासाठी आपली ताकद पणाला लावल्याचे म्हटले जात आहे. लोकसभा निवडणुकीत पंकजा मुंडे यांना निवडूण आणण्यासाठी डॉ. योगेश क्षीरसागर आणि डॉ. सारिकाताई क्षीरसागर यांनी जीवाचे रान केले. बीड मतदार संघात त्यांनी प्रत्येक गावात जावून मतदान करण्याचे आवाहन करीत जातीपातीचे राजकारण कधीही विकासाच्या दृष्टीने चांगले नसते असे मतदारांना पटवून दिले. त्यामुळे भाजप नेत्या आ. पंकजा मुंडे यासुध्दा डॉक्टर क्षीरसागर दाम्पत्यांवर खूश आहेत. बीडची जागा राष्ट्रवादीला दिली जात असेल तर त्या सुध्दा विरोध करणार नसल्याचे म्हटले जात आहे.

अजित पवार गटात प्रवेश केल्यापासून डॉ. योगेश क्षीरसागर यांनी बीड मतदार संघात कार्यकर्त्यांची मोट बांधली असून सामान्यांची कामे करण्यासाठी आपला पुर्णवेळ दिला. त्यामुळे बीड मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद वाढली असून अमर नाईकवाडे, फारुख पटेल, कल्याण आखाडे, बबनराव गवते, मोईन मास्टर, महिला आघाडी अध्यक्षा अ‍ॅड. प्रज्ञाताई खोसरे, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष इक्बाल शेख, अ‍ॅड. नागेश तांबारे, नंदकुमार कुटे, राजेंद्र राऊत नगरसेवक शुभम धूत, शाकेरा शेख, शुभम कांतागळे, अजिंक्य आनेराव, बाळासाहेब गुजर अशा मावळ्यांच्या सहकार्याने बीड विधानसभा मतदार संघात डॉ. योगेश क्षीरसागर भाकरी फिरवण्यासाठी सज्ज झाले आहे. यासाठी अजित दादांनी डॉ. क्षीरसागर दाम्पत्याला फक्त लढ म्हणण्याची गरज आहे.

--------

### अजितदादांच्या सभेस मोठ्या संख्येने

खा.प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे, राष्ट्रीय प्रवक्ते तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्यासह इतर मंत्री, पक्षाचे सर्व सेलचे प्रदेशाध्यक्ष, नेत्यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. ही यात्रा बीडमध्ये दाखल झाल्यानंतर पोलीस मुख्यालयापासून युवकांची दुचाकी रॅली काढून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन केले जाईल. सभास्थळी ना.अजितदादा पवार हे महिला भगिनींशी संवाद साधतील. या जनसन्मान यात्रेस बीड विधानसभा मतदारसंघासह जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह महिला भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी केले आहे.

----------------

### अ‍ॅड.सुभाष राऊतांकडे

आतापर्यंत अनेकदा आंदोलने केली. अडचणीत असलेल्या असंख्य लोकांना त्यांनी आधार देण्याचे काम केले आहे. बीड जिल्ह्यासह राज्यभरात त्यांचा दांडगा जनसंपर्क असून कार्यकर्त्यांची मोठी फळी त्यांनी निर्माण केली आहे. मंत्री छगन भुजबळ यांच्या शिफारशीवरुन दोन दिवसापुर्वी राऊत यांची राज्य अन्न आयोगाच्या सदस्यपदी निवड करण्यात आली होती. अन्न आयोगाचे अध्यक्षपद रिक्त असल्याने राज्य सरकारने अ‍ॅड सुभाष राऊत यांच्यांकडे अध्यक्षपदाचा अतिरिक्त पदभार दिला आहे. अन्न आयोगाच्या अध्यक्षपदाला राज्य मंत्र्याचा दर्जा असून राऊत यांच्या निवडीमुळे बीड जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

---------

### नितीन गडकरींनी मैदानात

अनुषंगाने जास्त सक्रिय भूमिका बजवावी असे संघाला वाटत आहे. २०१४ नंतर गडकरी दिल्लीत आणि त्यांनी महाराष्ट्रात लक्ष घालायचे नाही अशी सीमारेषा पक्ष श्रेष्ठींनी घालून दिली होती.

**गडकरी - फडणवीस कॉम्बिनेशन महाराष्ट्रात चालणार?**

राजकीय विश्लेषकांना ही विद्यमान राजकीय परिस्थितीत गडकरी यांचं महाराष्ट्रात जास्त सक्रिय भूमिकेत येणं आवश्यक वाटते. राजकीय विश्लेषकांच्या मते गडकरी यांनी २०१९ नंतर त्यांना महाराष्ट्राच्या दैनंदिन राजकारणापासून बाजूला ठेवले असले, तरी त्यांनी कधी ही महाराष्ट्रातील प्रचाराला नकार दिलेले नाही. शिवाय मतदारांच्या ज्या समूहात भाजपला आजिबात मतदान मिळणार नाही, अशा वर्गात ही गडकरींची प्रतिमा इतर भाजप नेत्यांच्या तुलनेत चांगली आहे. त्यामुळे त्याचा फायदा भाजपला मिळेलच. तर दुसऱ्या बाजूला भाजप पदाधिकाऱ्यांना ही गडकरी महाराष्ट्रात आवश्यक वाटतात. गडकरी सध्या महाराष्ट्राच्या राजकारणात आवश्यक ठिकाणी मार्गदर्शन करतात. मात्र, ते आताच्या तुलनेत जास्त सक्रिय झाले आणि गडकरी - फडणवीस असा कॉम्बिनेशन महाराष्ट्रात राहिला तर भाजपला त्याचा भरीव फायदा मिळेल असे भाजप पदाधिकाऱ्यांना वाटत आहे.

-----------

### कुंडलिक खांडेंना

आली होती. न्यायालयाने दिलेल्या पोलिस कोठडीची मुदत संपल्यावर त्यांना न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आले. खांडे यांच्याकडून जामीन मिळावा यासाठी उच्च न्यायलयात याचिका दाखल केली होती. मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठाने न्या. शिवकुमार डिगे यांच्यासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. या प्रकरणात दि. २२ तारखेलाच युक्तीवाद पुर्ण झाला होता. न्यायालयाने हे प्रकरण निर्णयासाठी राखून ठेवले होते. त्यानंतर त्यावर बुधवारी न्यायालयाने कुंडलिक खांडे यांना एका अटीवर जामीन मंजूर केला. प्रकरणाची सुनावणी सुरु होत नाही तोपर्यंत कुंडलिक खांडे यांना त्यांच्या स्वत:च्या गावात जाण्यास न्यायालयाने मनाई केली आहे.

---------

### भाजपचे केंद्रीय नेतृत्व

महाराजांचा ३५ फूट उंचीचा भव्य पुतळा उभारण्यात आला होता. खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या शिवरायांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं अनावरण करण्यात आले होते. पण अवघ्या आठ महिन्यात हा पुतळा कोसळला आहे. त्यामुळे मोठा वाद निर्माण झाला आहे. शिवरायांच्या पुतळा कोसळल्याने भाजपचे केंद्रीय नेतृत्व राज्य सरकारवर नाराज असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या घटनेनंतर काही मंत्र्यांची विधानं हास्यास्पद आणि चिंताजनक असल्याची तक्रार करण्यात आली आहे. राज्य सरकारने प्रकरण गांभीर्याने हाताळायला हवे होते, अशी भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाची भूमिका आहे. घटना कुणामुळे घडली, जबाबदारी कुणाची यावर भाष्य करण्यापेक्षा जनतेमधील असंतोष वाढू न देणे गरजेचे आहे. शिवरायांच्या पुतळ्याची योग्य देखभाल घ्यायला हवी होती, असे मत भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाचं आहे. तसेच विरोधकांकडून या घटनेचा राजकीय मुद्दा बनवला जात असेल तर गांभीर्याने विचार करावा, असा सल्ला भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने राज्य सरकारला दिला आहे. संवेदनशील प्रकरण काळजीपूर्वक आणि सबुरीने हाताळण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. अशा घटना आणि विधानांमुळे कल्याणकारी योडनांच्या प्रचारामध्ये अडथळा ठरु शकतो, असे मत भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाचे आहे.

**'सर्व योजनांना एकप्रकारे खो बसतोय'**

बदलापूरमधील प्रकरण राज्य सरकारला जड गेले. त्यानंतर आता मालवणमधील छत्रपती शिवरायांचा पूर्णाकृती पुतळा कोसळल्याचे प्रकरण घडले आहे. या प्रकरणांमुळे भाजपचे केंद्रीय नेतृत्व नाराज आहे. राज्य सरकार काही कल्याणकारी योजना घेऊन जनतेसमोर जात होते. पण त्या सर्व योजनांना एकप्रकारे खो बसतोय, सरकारचे काम कमी पडतंय, अशी नाराजी केंद्रीय नेतृत्वाने व्यक्त केली आहे, अशी माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

**मंत्र्यांच्या विधानावरुन केंद्रीय नेतृत्व नाराज**

छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळला तेव्हा राज्य सरकारमधील मंत्र्यांच्या वेगवेगळी प्रतिक्रिया समोर आल्या. राजकोट किल्ला हा समुद्र किनाऱ्यावर असल्याने तिथे वाऱ्याचा वेग ताशी ४५ किमी इतका होता, तसेच खाऱ्या पाण्यामुळे पुतळ्याला गंज लागला होता, अशा प्रतिक्रिया मंत्र्यांकडून देण्यात आल्या होत्या. त्याचबरोबर मंत्री दीपक केसरकर स्वत: बोलले की, ही महाराजांची इच्छा असेल. मंत्र्यांच्या या वक्तव्यावरुन भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने नाराजी व्यक्त केली. त्याचबरोबर पुतळा कोणामुळे पडला? त्याची जबाबदारी कुणाची होती? यापेक्षा जनतेमध्ये असंतोष निर्माण होऊ नये याची काळजी आणि खबरदारी मंत्र्यांनी आणि सरकारमधील लोकप्रतिनिधींनी घ्यावी, अशी अपेक्षा आहे, अशी प्रतिक्रिया केंद्रीय नेतृत्वाने दिली आहे.

---------------------

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार दि.२९ ऑगस्ट २०२४
३

## खोलेश्वर विद्यालय दिंद्रुड येथे दहीहंडी उत्सव साजरा

दिंद्रुड : माजलगाव तालुक्यातील खोलेश्वर विद्यालय दिंद्रुड येथे श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या औचित्याने मंगळवारी दहीहंडी



उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी खोलेश्वर विद्यालयाचे अध्यक्ष मा. दिलीपराव पारेकर यांच्यासह कार्यक्रमासाठी खास उपस्थित असलेले श्री. सूर्यकांतजी अंबुरे, श्री. अनिलजी जाधव, श्री. बाबुरावजी पारेकर यांनी श्रीकृष्णाच्या प्रतिमेचे पूजन करून दहीहंडी उत्सवास सुरुवात केली. शाळेतील विद्यार्थ्यांनी दहिहंडी फोडत जल्लोष साजरा केला. याप्रसंगी विद्यार्थिनींनी पारंपरिक नृत्य सादर करून उपस्थितांची वाहवा मिळवली. खोलेश्वर विद्यालयाचे सर्व शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. या दहीहंडी चे नियोजन खोलेश्वर विद्यालयाच्या सर्व शिक्षकांनी अतिशय सुंदर केले होते.

# आ. पंकजा मुंडे यांचा निलंगा, तुळजापूर, अक्कलकोट मतदारसंघांत कार्यकर्ता संवाद दौरा ; विधानसभा मतदारसंघाचाही घेतला आढावा

### वलांडीत आ. संभाजी पाटील निलंगेकर यांच्या जनसन्मान पदयात्रेत सहभाग ; पुन्हा एकदा आपलं सरकार आणायचं आहे, जोमाने कामाला लागा

लातूर /धारशीव ।दिनांक २७। आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांनी आज निलंगा, तुळजापूर आणि अक्कलकोट मतदारसंघांत कार्यकर्ता संवाद दौरा करून मतदारसंघांचा आढावा घेतला. वलांडी येथे आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या जनसन्मान पदयात्रेतही त्यांनी सहभाग घेतला. येणाऱ्या निवडणुकीत जोमाने कामाला लागण्याचे आवाहन त्यांनी पदाधिकाऱ्यांना केले.

आ. पंकजाताई मुंडे यांनी सकाळी आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी सुरु केलेल्या जनसन्मान पदयात्रेत वलांडी ता. देवणी येथे सहभागी होऊन उपस्थित असंख्य जनसमुदायाशी संवाद साधला.



यावेळी बोलतांना पंकजाताई म्हणाल्या, लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांनी आयुष्यात जमा केलेली सर्व सामान्य माणसाच्या प्रेमाची शिदोरी जपायची असेल तर मन मोठं ठेवावं लागेल. मुंडे साहेब गेल्यावर मी कधीच रडणार नाही अशी शपथ घेतली होती. पण ज्यावेळेस लोकसभा निवडणुकीत माझा पराभव झाला आणि तो जिव्हारी लागून माझ्या जिवाभावाच्या कार्यकर्त्यांनी आत्महत्या केल्या त्यांना बघून मला अश्रू अनावर झाले. कारण तुमच्यासाठीच आमच्या मनामध्ये अश्रू आणि स्वप्न आहेत. संभाजीराव तुम्ही पदयात्रेची चांगली संकल्पना राबवली, तुम्हाला जनतेचे आशीर्वाद नक्की मिळतील. या भागातील देवणी गावाला तालुक्याचा दर्जा देण्याचे काम लोकनेते मुंडे साहेबांनी केल्यामुळे येथील लोकांचं साहेबांवर विशेष प्रेम आहे, या निःस्वार्थ प्रेमाची प्रचिती

### पुन्हा एकदा आपलं सरकार आणायचं आहे

पदाधिकाऱ्यांशी बोलताना पंकजाताई म्हणाल्या, आरक्षण भारतीय जनता पार्टीचा मुख्यमंत्री असताना दिल गेलं हे ठणकावून सांगण्याची गरज आहे. आपल्याला पुन्हा एकदा आपलं सरकार आणायचं आहे, परत एकदा येथील आमदार आपल्याला निवडून आणायचा आहे. पक्षाने दिलेल्या सूचना, कार्यक्रमांची काटेकोर अंमलबजावणी करा.पक्ष आपल्या कामाचं कौतुक करतो, आपल्या भावना ऐकून घेतो त्यामुळे जोमाने कामाला लागा.

### संवादातून मतदारसंघांचा आढावा

आ. पंकजाताई मुंडे यांनी निलंगा, तुळजापूर आणि अक्कलकोट याठिकाणी भाजपा कार्यकर्त्यांशी संवाद साधून विधानसभा मतदारसंघाचा आढावा घेतला, त्यांची मतं जाणून घेतली. तुळजापूर येथे आ. राणा जगजितसिंह पाटील, अक्कलकोट येथे आ. सचिन कल्याणशेट्टी तसेच भाजपचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

### तुळजापूर, अक्कलकोट येथे घेतले दर्शन

आ. पंकजाताई मुंडे, त्यांच्या मातोश्री प्रज्ञाताई मुंडे यांनी तुळजापूर व अक्कलकोट येथे भवानी आई आणि स्वामी समर्थाचे दर्शन घेतले. देवस्थान समितीच्या वतीने यावेळी त्यांचा सत्कार करण्यात आला.

त्यांनी केलेल्या उत्स्फूर्त स्वागतातून आली.

माझ्या महाराष्ट्रातील लेकींचा विश्वास ढळू देणार नाही

याप्रसंगी उपस्थित महिलांनी 'उमेद' या महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणाऱ्या संस्थेचा विशेष उल्लेख केला. यावेळी पंकजाताई म्हणाल्या, मी राज्याची महिला व बालविकास मंत्री असताना आम्ही या संस्थेची सुरुवात केली. राज्यातील महिलांना सक्षम करण्यासाठी आम्ही सातत्यपूर्ण प्रयत्न करत आहोत, यापुढेही करत राहू. माझ्या महाराष्ट्र ची लेक विश्वासाने भरलेली मला पाहायची आहे आणि हे माझं स्वप्न आहे, यासाठी सतत कार्य करत राहूअसा विश्वास यावेळी उपस्थितांना देऊन आ. निलंगेकर यांना शुभेच्छा दिल्या.


## श्री सिद्धेश्वर महाविद्यालयास २९ व ३० ऑगस्ट रोजी नॅक समितीची भेट

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्री सिद्धेश्वर महाविद्यालयाचे बेंगलोर येथील नॅक पीयर टीमकडून दिनांक २९ व ३० ऑगस्ट २०२४ रोजी मूल्यांकन होणार आहे.

या समितीचे अध्यक्ष म्हणून प्रोफेसर पी.पी. अजयकुमार (कुलगुरू, युनिव्हर्सिटी ऑफ केरला, तिरुअनंतपुरम) तसेच समन्वयक म्हणून प्रोफेसर मोहन सिंग (इलाहाबाद विश्वविद्यालय, इलाहाबाद, ) व सदस्य म्हणून प्रोफेसर मुजफ्फर अहमद भट्ट (प्राचार्य, गव्हर्मेंट डिग्री कॉलेज, अनंतनाग जम्मू-कश्मीर) हे असणार आहेत.यावेळी ते महाविद्यालयातील वेगवेगळ्या विभागांचे,मंडळांचे, व विविध समिती यांचे प्रत्यक्ष भेटी द्वारे मूल्यमापन करणार आहेत. त्याचबरोबर दुपारच्या सत्रामध्ये संस्थेच्या व्यवस्थापन मंडळा सोबत ते चर्चा करणार आहेत. त्यानंतर आजी विद्यार्थी, माजी विद्यार्थी , पालक तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्याशी संवाद साधणार आहेत. त्यानंतर सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात







आलेले आहे. महाविद्यालयाने राबविलेल्या विशेष उपक्रमांची माहिती सुद्धा ते घेणार आहेत. त्याचबरोबर दत्तक ग्राम योजनेअंतर्गत असलेल्या गावातील प्रतिष्ठित नागरिकांशी ते संवाद साधणार आहेत. दिनांक ३० ऑगस्ट रोजी दुपारच्या समारोप बैठकीनंतर ते महाविद्यालयाचा अहवाल प्राचार्यांना सादर करतील. यासाठी श्री सिद्धेश्वर महाविद्यालयातील आजी विद्यार्थी, माजी विद्यार्थी व पालक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाविद्यालयाच्या मूल्यांकनामध्ये आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष श्री. अभय कोकड, प्राचार्य प्रोफेसर सुहास मोराळे, नॅक समन्वयक डॉ. विनायक देशमुख व सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले आहे.



## दिवंगत खा.वसंत चव्हाण यांना श्रद्धांजली अर्पण

**माजलगाव । प्रतिनिधी**

नांदेड लोकसभा मतदारसंघाचे राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे दिवंगत खासदार वसंतराव चव्हाण यांना माजलगाव महाविकास आघाडीच्या वतीने दि २८ ऑगस्ट बुधवार रोजी श्रद्धांजली वाहण्यात आली.या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (शरद पवार गट) तालुकाध्यक्ष मनोहर डाके,जिल्हा सरचिटणीस कचरु तात्या खळगे, शहरध्याक्ष शकील कुरेशी,दत्ता रांजवन,अभय होके,शुभम डाके यांच्यासह महाविकास आघाडीचे असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते

पान ६ वरुन...

### पिक विमा, सरसकट

यांच्याशी सकारात्मक चर्चा करण्यात आली. लवकरच राज्याच्या कृषीमंत्र्यांची भेट घेऊन या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी संभाजी ब्रिगेड, शेतकरी संघटना यांचे शिष्टमंडळ तसेच विमा कंपनी आणि कृषि विभाग यांचे अधिकारी यावेळी उपस्थित असतील असे आश्वासन दिल्यानंतर उपोषणाची सांगता झाली. तत्पूर्वी संभाजी ब्रिगेडच्या वतीने उपजिल्हाधिकारी यांना १६ ऑगस्ट रोजी तर तालुका कृषी अधिकारी यांना २० ऑगस्ट रोजी निवेदन दिले आहे. आमच्या या मागण्या लवकर नाही मान्य केल्या तर आम्ही संभाजी ब्रिगेडच्या वतीने जिल्हाभर आंदोलन करू याची नोंद घ्यावी असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. निवेदनावर संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष प्रविण ठोंबरे, संभाजी ब्रिगेड महिला आघाडी जिल्हाध्यक्षा अश्विनीताई यादव, तालुकाध्यक्षा सुनंदाताई लोखंडे, संभाजी ब्रिगेड जिल्हा उपाध्यक्ष अरूण पवार, जिल्हा सचिव नारायण मुळे, तालुकाध्यक्ष सिद्राम यादव, शहरसचिव प्रेम कांबळे, कार्यकर्ते अंगद कांबळे, अभिषेक माने, पृथ्वीराज सोनवणे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. संभाजी ब्रिगेडच्या एक दिवसीय लाक्षणिक उपोषणाला शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष कालिदास आपेट, जिल्हाध्यक्ष अनुरथ काशिद, मराठा सेवा संघाचे मा.जिल्हाध्यक्ष रामकिसन मस्के, रामराजे शिंदे, दत्ता साखरे, रोहन कुलकर्णी, सतिश कुंडगिर, केशव टेहरे, परमेश्वर मिसाळ, शिवाजी जगताप, विलास जाधव, बब्रुवान सोळंके, पांडुरंग तट, सुभाष मायकर, गोविंद जामदार, महादेव जामदार, दत्तात्रय मुळे, वशिष्ठ वानखेडे, हनुमंत काळे या तालुक्यातून आलेल्या शेतकऱ्यांनी जाहीर पाठिंबा दर्शविला. यावेळी संभाजी ब्रिगेडच्या विविध आघाड्यांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### मानवी हक्क अभियानच्या धारूर

बांधनी मजबुत पणे करावी संघटनेचा प्रत्येक उपक्रम प्रभावी पणे रावण्याचे आवाहण राष्ट्रीय अध्यक्ष डा मिलिद आवाड यांनी केले. याबैठकीला मानवी हक्क अभियान चे महादेव उमाप, परमेश्वर आडागळे, आप्पा मुजमुले, हानूमंत आडागळे, रामकिसन लोंखडे, रमेश गवळी, रमेश जाधव, विष्णु मुजमुले, सुरज लोंखडे, किसन लोखंडे, प्रदीप आडागळे, राजू लोखडे, तुकाराम तोंडे, महादेव लोखडे, सुनिल आडागळे, कचरू काबळे, धनराज लोंखडे सह तालुक्यातील कार्यकर्ते मोठ्या सख्येने उपस्थीत होते

### आर्थिक स्वार्थासाठी पक्ष सोडून

काट्यात माप मारायचे आणि कमवलेले पैसे निवडणुकीत मतदारांना वाटायचे हा प्रकार विरोधक नेहमी करतात. त्यामुळे तालुक्यातल्या स्वाभिमानी जनतेने त्यांना कधीच स्वीकारले नाही. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सरपंच किरण आहेर यांनी केले तर पंढरीनाथ लगड, महादेव औटी, तय्यब पठाण, बाबुराव कोल्हे आदींची समयोचित भाषणे झाली. सूत्रसंचालन अरुण कातकडे यांनी केले. कार्यक्रमास वसंतराव बने, अशोक आहेर, नंदू खरात, तात्यासाहेब शेळके, बाबुराव कापसे, बदाम पौळ, अमोल सुतार, भागवतराव वडघणे, शेख महेमूद, दादासाहेब संत, दादासाहेब खरात, दत्ता खरात, राजू नाडे, राधाकिसन धोत्रे, शेख अजहर, अजित वर्मा, शेख नाझीर, दादा शिंदे, किशोर राठोड, शेख लालमिया, भैय्यासाहेब वाकडे, बंडू बोरकर, नागेश पाटोळे, अमोल वाकडे, लायक कुरेशी, संदीप आहेर, बाजीराव धोत्रे, अमर बने, भल्ला कापसे आदींसह शिवसैनिक व पदाधिकारी बहुसंख्येने उपस्थित होते.

### कृषी प्रदर्शनाचा शेतकऱ्यांनी

मार्गदर्शन लाभणार आहे.कृषी प्रदर्शनासाठी आलेल्या शेतकऱ्यांच्या नावांमधून दर तासाला लकी ड्रॉ काढण्यात येईल व लकी शेतकऱ्यांला शेती उपयोगी भेट वस्तू देण्यात येईल. शेवटच्या दिवशी बंपर लकी ड्रॉ काढुन विजेत्याला बक्षीस दिले जाईल. कृषी प्रदर्शनात दुध उत्पादक शेतकऱ्यांसाठी वेगवेगळे अत्याधुनिक मशिन, कुक्कुटपालन माहिती तसेच बँके मधून लोन कसे काढायचे यांची माहिती मिळणार आहे. शेतकऱ्यांच्या मनोरंजनासाठी रोज सायंकाळी शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रमा अंतर्गत पारंपारीक लोकगीते, लोककला, नाटक, शास्त्रीय संगीत, शेतकरी गीते, लोकनृत्य यांचे सादरीकरण करण्यात येतील.आयोजक वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी संलग्न श्री छत्रपती,शाहु,फुले, आंबेडकर महाविद्यालय आष्टी आहेत. हे प्रदर्शन मोफत आहे त्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी, व्यावसायिकांनी , नागरीकांनी लाभ घेण्याचे आवाहन डॉ हरिदास शेलार यांनी केले आहे.

### तिसऱ्या वर्षीही तीच

छत्रपती शिवाजी महाराज चौक,रस्ता गर्दीने तुडुंब फुलला होता,सतत तिसऱ्या वर्षीही या उत्साहाची क्रेज तीच होती,जल्लोष तोच होता,तरुणाई मध्ये संचारलेला आनंदाच्या भरतीचा तरंग आकाशाला गवसनी घालत होता. शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख आप्पासाहेब जाधव यांनी तीन वर्षांपूर्वी शहरात दहीहंडी उत्सवाची जंगी सुरुवात केली आहे.प्रत्येक वर्षी हा उत्सव माजलगावकरांसाठी एक पर्वणी ठरत आहे.छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे बी अँड सी रोडवर भव्य व्यासपीठ उभारून हा सोहळा दिमाखात तरुणांना आपल्याकडे खेचत आहे.उत्सवाचे

हे तिसरे वर्ष आहे.यंदाही ऑर्केस्ट्राच्या मराठी हिंदी गीतांवर तरुणाई या दहीहंडी उत्सवात थिरकताना दिसली.शिट्ट्या,टाळ्या, वन्स मोर..च्या गगनभेदी आरोळ्यानी आनंदाची भरती याठिकाणी उसळ्या मारताना दिसत होती.ऑर्केस्ट्राच्या गीतावर बेधुंद झालेली तरुणाई मन तृप्त करत कलाकारांसह आयोजकांना दाद देत होती.तीन तासाच्या सदाबहार नृत्य,गीतांच्या मेजवानी नंतर डीजेच्या चालीवर उपस्थित गोविंदा पथकाने मनोऱ्यावर मनोरे रचत येथील दहीहंडी फोडली. यावेळी जय बजरंग गोविंद पथकाचे अध्यक्ष राहुल पवार, उपाध्यक्ष अशोक चव्हाण व टीमने चित्तथरारक असे प्रदर्शन करीत दहीहंडी फोडली.व दहीहंडीचे ५५ हजार ५५५ रुपये पारितोषिक पटकावले.दहीहंडी उत्सवाचे आयोजक आप्पासाहेब जाधव यांनी अशा सांस्कृतिक उत्सवातून माजलगावचे नाव मराठावाडा स्तरावर नेणार असल्याचे यावेळी सांगितले.

## महावितरण व त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या चुकीच्या अहवालाविरोधात पटेल यांचे आमरण उपोषण

अंबाजोगाई । प्रतिनिधी

महावितरण अंबाजोगाई व त्याच्या अधिकारी व कर्मचारी यांनी वाजेद पटेल यांचे दुकान जळल्याप्रकरणी चुकीचा अहवाल दिल्याने त्याविरोधात वाजेद पटेल यांनी अंबाजोगाई येथे उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे.

दिनांक २६ मार्च २०२४ रोजी सदर बाजार परिसरात मुकुंदराज विद्यालयाच्या शॉपिंग कॉम्प्लेक्स मध्ये वाजेद पटेल यांचे दानिश कलेक्शन या कपड्याच्या दुकानाला शॉटसर्किटने आग लागली होती. या आगीमुळे दुकानातील दुकानातील अंदाजे २५ लाखाचे कपडे व इतर साहित्य जळून खाक झाले आहे. या घटनेची माहिती तात्काळ अग्निशमन दल पोलीस प्रशासनास दिली होती. घडलेल्या घटनेचा पोलीस पंचनामा देखील करण्यात आला. महावितरणच्या अभियंता यांनीही घटनास्थळी पेवून पंचनामा केला. यामध्ये शेजारच्या दुकानदाराचे जवाबही नोंदविण्यात आले. परंतु महावितरण कंपनीने तब्बल चार महिन्यानंतर या जळीत प्रकरणाचा निष्कर्ष अहवाल सादर केला. या निष्कर्ष अहवालात विद्युत निरीक्षक यानी असे नमूद केले की, माझ्या दुकानात अंतर्गत संचाने दुकानाला आग लागून ही घटना घडली. या चुकीच्या अहवालामुळे माझे कुटुंब अक्षरशः उघडयावर पडले असून माझ्या कुटुंबाची उपजिवीका भागविण्याचे साधन संपले आहे.

या जळीत घटनेची सविस्तर



पार्श्वभूमी अशी की, दिनांक २५/०३/२०२४ रोजी माझ्या दुकानासमोर असलेल्या डी.पी. मधून विज दाब कमी जास्त होत होता. तसेच ज्या पोलवरून माझ्या दुकानात विद्युत कनेक्शन देण्यात आले होते त्या पोलवर स्पार्किंग देखील होत होती. यामुळे बीज दाब कमी जास्त होत होता. पोलवर स्पार्किंग होत आहे म्हणून मी व माझ्या शेजारील दुकानदारानी लाईनमन पांचाळ यांना मोबाईलवर कॉल करून वीज दाब कमी जास्त होत आहे. तसेच पोलवरुन स्पार्किंग होत आहे याची माहिती दिली. या तक्रारीची लाईनमन पांचाळ यानी कसलीही दखल न घेता निष्काळजीपणा करुन दुसरा मोबाईल क्रमांक सांगत तिथे या क्रमांकावर तुमची तक्रार नोंदवा असे सांगितले. नंतर तिथेही कोनी कॉल घेत नसल्याची माहिती दिली. यावर देखील दि. २५/०३/२०२४ रोजी वारंवार कॉल करून कुणीही महावितरण कंपनीचे कर्मचारी घटनास्थळी आले नाहीत. विशेष म्हणजे पटेल यांच्या दुकानात अंदाजे २५.०० लाखाचा कपड्याचा माल भरलेला होता.

दैनंदिन प्रमाणे दि. २५/०३/२०२४ च्या रात्री दुकान बंद करून घरी गेले असताना दि. २६ मार्च २०२४ रोजीच्या पहाटे पटेल यांना मित्राचा फोन आला की, तुमच्या दुकानातुन मोठ्या प्रमाणात धूर निघत आहे. तेव्हा तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन दुकानाचे शटर उघडून पाहिले असता अख्खे दुकान जळून खाक झाल्याचे दिसून आले. तेथे अग्निशामन दलाचे जवान घटनास्थळी येऊन आग अटोक्यात आानली. पोलीस प्रशासनाने देखील घटनास्थळी येऊन पंचनामा करून शेजारी असलेल्या दुकानदाराचे जवाब नोंदविले.

प्रत्येक दुकानदाराने आपल्या जवाबात स्पष्ट सांगितले की, दुकना समोरील डि.पी. तुन विज दाब कमी-जास्त होत होता. तसेच पोलवर स्पार्किंग होत होती. परंतु संबंधीत विद्युत निरीक्षक यांनी चार महिन्यानंतर दिलेल्या अहवालात माझ्या दुकानातील वीज संचात दोष दाखवून महावितरणने स्वतःची चुक झाकण्याचे काम केले. त्यानंतर या सर्व बाबींचा पाठपुरावा केला असता असे दिसून आले की, दुकानासमोरील पोलवरुन जे कनेक्शन माझ्या दुकानाच्या वीज मिटरमध्ये देण्यात आले होते ते कनेक्शन थेट न देता मिटरला पोलवरुन

येणाऱ्या केबल गुंडाळून कनेक्शन देण्यात आले होते. मीटरला केबल गुंडाळलेले असल्याने

त्यात कॉईल तयार होवून हा शॉटसर्किट झाला असवा. दुकानाला वीज मिटर देतांना सर्व टेस्ट रिपोर्ट घेवूनच मिटर देण्यात आले होते. तर मग माझ्या दुकानातील वीज संचात दोष कसा असू शकतो. एकंदरीत विद्युत निरीक्षक यांनी दिलेला अहवाल चुकीचा असून या घटनेची फेर तपासणी करुन मला न्याय देऊन झालेल्या नुकसानीची नुकसान भरपाई देण्यात यावी व कर्तव्यात कसुर करणारे लाईनमन पांचाळ व संबंधीत विद्युत निरीक्षक वाय.बी. शेंगुळे यांना तात्काळ निलंबीत करण्यात यावे. उपरोक्त बाबींची गाभिर्यपुर्वक विचार करुन मला तात्काळ न्याय देण्यात यावा या मागणीसाठी वाजेद पटेल यांनी दि २७ मंगळवार पासून आमरण उपोषण सुरू केले आहे. त्यांच्या या न्याय मागणीसाठी पटेल यांना सर्व स्तरातून पाठिंबा मिळत आहे.

## जयकिसान विद्यालयात स्वयंशासन दिन साजरा

अंबाजोगाई/ प्रतिनिधी: तालुक्यातील आपेगाव येथील जयकिसान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात स्वयंशासन दिन सोमवारी (दि. २६) उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी दहावीच्या विद्यार्थ्यांनी एक दिवसाकरीता शाळा चालवून प्रशासनाचा अनुभव घेतला.

विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण विकसीत होऊन त्यांच्यामध्ये स्वंशिस्त निर्माण व्हावी या उद्देशाने शाळेमध्ये स्वयंशासन दिनाचे आयोजन करण्यात येते. याप्रसंगी शाळेतील दहावीच्या विद्यार्थ्यांनी




या कार्यक्रमात सहभाग घेत एक दिवसासाठी शाळा चालवली. यावेळी दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांनी सेवकापासून ते मुख्याध्यापकाची सर्व कामे केली. यामध्ये मुख्याध्यापक म्हणून स्मिता जयराम काळदाते,पर्यवेक्षक श्रेया सुनील शिंदे, विभाग प्रमुख सुमित धनराज तट, लिपीक सार्थक कचरु इंगळे, इब्राहीम बशीर शेख, तर सेवक म्हणून मयुर राजेश बेंद्रे, राम मिटकरी, ओमकार हजारे यांच्या बरोबरच इतर विद्यार्थ्यांनी छात्र शिक्षक म्हणून काम केले. सकाळी स्वयंशासन दिनाचे उद्धघाटन संस्थेचे सचिव प्रा. जयजीत शिंदे, सहसचिव व्हि. जे. शिंदे, मुख्याध्यापक तथा प्राचार्य प्रा. एन. के. हजारे यांच्या हस्ते करण्यात आले. या विद्यार्थ्यांना शाळेचे शिक्षक एस. एन. घुले, एस. व्हि.देशमुख, जे. पी. काकडे, अनिल पवार, बी. यु. औताडे, ए.एन.घाटुळे यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी शाळेतील सर्व शिक्षकांसह कर्मचारी उपस्थित होते.

जा.क्र.न.प/अंबड/नामांतर/२०२४/५१०
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक- ०५/०८/२०२२४

नाव बदलण्याचा

### जाहिरनामा

अर्जदार श्री./सौ. श्रीमती :- निता दिगांबर जाधव रा.मोटपुरी ता. घनसावंगी जि. जालना'

प्रकरण : सर्वे नं.११ (भाग) सहान प्लॉट नं.१७ सी.स.नं.३०१३ न.प.मि.नं.१८-१६३-१७ तसेच सहान प्लॉट नं.१८ सि.स.नं.३०१४ न.प.मि.नं.१८-१६३-१८ चे हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प. मालमत्ता घर क्र. (१८-१६३-१७ ), १८-१६३-१८ दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला... येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा :
पुर्व :- ९ मीटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता, पश्चिम :- प्लॉट नं.१६
दक्षिण :- प्लॉट नं.१९ , उत्तर :- प्लॉट नं.१७ व १८ मधील भाग

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
गुरुवार दि.२९ ऑगस्ट २०२४
४

# नांदेडच्या शेतकऱ्याने ३ एकरातील पपईतून काढले १५ लाख!

राज्यातलं सुशिक्षित बेरोजगारांचं प्रमाण लक्षणीय आहे. पण नोकरीच्या मागं पळण्यापेक्षा शेतीतून कमाई करावी असं किती जणांच्या मनात येत असेल? नांदेडमधल्या लालबा जाधव या शेतकऱ्यानं आता बेरोजगारीवर उपाय शोधून काढलाय. उच्चशिक्षित तरुणानं नोकरीच्या मागे धावणं थांबवत पपई लागवडीतून वर्षाला १५ लाख रुपये कमवत आपला मार्ग शोधून काढलाय. नांदेडच्या अर्धापूर तालुक्यातील पांगरीचा हा शेतकरी आहे. उच्चशिक्षण घेतलं असलं तरी नोकरीच्या मागं न लागता त्यानं पपई लागवड करत चांगली कमाई केली आहे.

लालबा जाधव या तरुण शेतकऱ्यानं डीएड आणि बीएड आणि पदवीपर्यंत शिक्षण घेतलं. पदवीनंतर दोन तीन वर्ष नोकरीसाठी वणवण भटकले. पण नोकरी न मिळाल्यानं या तरुणानं शेती करण्याचा निर्धार केला. काहीतरी वेगळा प्रयोग करावा या उद्देशानं १२ एकरापैकी ३ एकरात पपईची लागवड करून पाहिली. ही लागवड यशस्वी झाली आणि समाधानकारक उत्पन्न कमवत पारंपरिक पिकांमधूनही भरघोस उत्पन्न मिळवलंय.




दरवर्षी विद्यापिठातून पदवी मिळवणाऱ्या असंख्य पदवीधरांमध्ये नोकरीचा प्रश्न गंभीर झालाय. बाहेर निघणाऱ्या तरुणांना देण्यासाठी नोकऱ्या कमी असल्यानं त्यांच्या नोकरीसह लग्नाचाही प्रश्न समोर आला आहे. आता काहीतरी पर्याय काढायचा निर्धार करत लालबा जाधव यांनी ३ एकरात पपई लागवड केली. यातून आता त्यांना १३ ते १५ लाख रुपयांची कमाई मिळते. त्यामुळं नोकरी मिळणं अवघड असताना या तरुणाला शेतीनंच तारलं आहे. यासाठी नगर जिल्ह्यातून त्यांनी २७०० पपईची रोपं आणली. सध्या बाजारात १५ ते १६ रुपयांचा भाव एका पपईला मिळत असल्याचं ते सांगतात.

लालबा जाधव यांची एकूण १२ एकर जमिन आहे. त्यातील ३ एकरावर पपई लावली असून उर्वरित क्षेत्रात त्यांनी केळी, हळद आणि सोयाबीनही लावलं आहे. त्यातूनही भरघोस उत्पन्न मिळवत त्यांनी आर्थिक प्रगती साधली आहे. पारंपरिक पिकांसह पपईची लागवड या शेतकऱ्यानं केली आहे. या पपईच्या उत्पादनातून लालबा जाधव हे वर्षाकाठी तब्बल १५ लाख रुपयांचे उत्पन्न मिळवत आहेत. ते त्यांच्या घरच्या तीन एकर शेतीमध्ये दरवर्षी पपईची लागवड करतात. यावर्षी देखील पपईला चांगली मागणी मिळाल्यामुळे या शेतकऱ्याला भरघोस उत्पन्न मिळाले आहे.

अवकाळीनं पपईला बसला फटका

काही महिन्यांपूर्वी झालेल्या अवकाळी पावसाने लालबा जाधव यांच्या पपईला मोठा फटका बसला होता. पपईची लागवड ते माल काढणीपर्यंत १९ महिने पपईने भरभरून साथ दिली आज तिचा शेवटी दिवस पपईचा निरोप घेताना असे लिहीत या शेतकऱ्याने काही दिवसांपूर्वी सोशल मिडीयावर याबाबत माहितीही दिली होती.

## कृषी प्रदर्शनाचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा -शेवाळे

पाटोदा। प्रतिनिधी

शेतकऱ्यांचे नेते मा.आ.भिमराव धोंडे यांच्या संकल्पनेतून मराठवाड्यातील सर्वात मोठे आष्टी तालुक्यात दुसऱ्यांदा कृषी प्रदर्शन संपन्न होत आहे.यामध्ये भारतातील सर्वात उंच ५१ लाखाचा सोन्या नावाचा कोसा बैल प्रमुख आकर्षण असणार आहे. यासोबतच लाडक्या बहिणींसाठीउद्धव के.पी. प्रस्तूत महाराष्ट्रभर गाजत असलेला महिला भगिनींचा एकमेव आवडता कार्यक्रम खेळ पैठणीचा, शेतकऱ्यांच्या मनोरंजनासाठी रोज सायंकाळी शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रमा अंतर्गत पारंपारीक लोकगीते, लोककला,नाटक, शास्त्रीय संगीत, शेतकरी गीते, लोकनृत्य यांचे सादरीकरण करण्यात येतील.यासह बरेच काही असणार आहे. शेती व ग्रामीण भागातील बदलत्या तंत्राची महत्त्वपूर्ण माहिती मिळणार असल्याने आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघासह जिल्ह्यातील व्यावसायिक व शेतकरी वर्गाने,कृषी प्रदर्शनाचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन गणेश शेवाळे यांनी केले आहे.आष्टी शहरात मा.आ.भिमरावजी धोंडे साहेब यांच्या संकल्पनेतून मराठवाड्यातील सर्वात मोठे राज्य स्तरीय कृषी प्रदर्शन दि .२९ ऑगस्ट ते १ सप्टेंबर या कालावधीत पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयासमोर कृषी प्रदर्शन सभामंडपात संपन्न होत आहे.या



प्रदर्शनाचे उद्घाटन कृषी मंत्री ना. धनंजय मुंडे व लोकनेत्या आ. पंकजाताई मुंडे,आदर्श सरपंच पोपटराव पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.सांगली येथील व देशातील सर्वात उंच ५१ लाख रुपये किमंतीचा खिलार कोसा जातीचा सोन्या बैल प्रदर्शनाचे विशेष आकर्षण ठरणार आहे. कृषी प्रदर्शनाच्या निमित्ताने चार दिवस दररोज दुपारी १२ ते २ या वेळेत कृषी संबंधित तज्ञांचे शेतकऱ्यांना मार्गदर्शन लाभणार आहे.कृषी प्रदर्शनासाठी आलेल्या शेतकऱ्यांच्या नावांमधून दर तासाला लकी ड्रॉ काढण्यात येईल व लकी शेतकऱ्यांला शेती उपयोगी भेट वस्तू देण्यात येईल. शेवटच्या दिवशी बंपर लकी ड्रॉ काढुन विजेत्याला बक्षीस दिले जाईल. कृषी प्रदर्शनात दुध उत्पादक शेतकऱ्यांसाठी वेगवेगळे अत्याधुनिक मशिन, कुक्कुटपालन माहिती तसेच बँके मधून लोन कसे काढायचे यांची माहिती मिळणार आहे. शेतकऱ्यांच्या मनोरंजनासाठी रोज सायंकाळी शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रमा शेवाळे यांनी केले आहे.

## जवस लागवडीसाठी सुधारित जातीचा करा वापर

जवस हे महत्वाचे तेलबिया पीक आहे. या शेतीचा उपयोग तेल व धागानिर्मितीसाठी केला जातो. या पिकामध्ये ८ प्रकारची जीवनसत्त्वे खनिजे आहेत. यासह जवस हे अतिशय पौष्टिक मानले जाते.जवसाच्या तेलामध्ये ५८ % ओमेगा-३, ओमेगा-६, कोलेस्ट्रेरॉलल आणि अँटिऑक्सिडंट आहेत. जवस तेलाच्या एकूण उत्पादनापैकी २०% खाद्यतेल म्हणून, तर ८०% तेलाचा औद्योगिक क्षेत्रात साबण, पेंड, व्हॉर्निस, शाई तयार करण्यासाठी वापर होतो. यासह जवसाची ढेप दुभत्या जनावरांसाठी उत्तम खुराक देखील मानला जातो. दुहेरी फायदा होऊ शकतो. जवसाची पेरणी ऑक्टोबरच्या पहिल्या पंधवड्यात करावी. दोन ओळींतील ३० सेंमी किंवा ४५ से.मी. अंतर ठेवावे. तर दोन रोपांमधील अंतर १० सें.मी. ठेवावे. पेरणी ५ ते ७ सेंमीपेक्षा अधिक खोल करू नये. अधिक उत्पादनासाठी रोपांची




संख्या प्रति हेक्टरी ४.५ ते ५ लाख असावी. त्यासाठी शिफारस केलेले शुद्ध प्रमाणित, टपोरे व निरोगी बियाणे प्रति हेक्टरी ८ ते १० किलो प्रति हेक्टरी वापरा.

शारदा : कोरडवाहूसाठी उत्तम आहे. १००- १०५ दिवस कालावधी, ४१ % तेलाचे प्रमाण असते. उत्पादन ८०० किलो/हेक्टर मिळते. मर, भुरी, अल्टरनेरिया रोगास व गादमाशी किडीस प्रतिकारकक्षम आहे. एन.एल-९७ : ११५-१२० दिवस कालावधी, ४२ % तेलाचे प्रमाण असते, तसेच उत्पादन ६००-१२०० किलो/हेक्टर मिळते. मर, भुरी, अल्टरनेरिया रोगास व गादमाशी किडीस ही जवसाची जात प्रतिकारकक्षम आहे. एन.एल-२६० : १११-११५ दिवस कालावधी, ४३ % तेलाचे प्रमाण असते. उत्पादन १५००-१६०० किलो/हेक्टर मिळते. मर, भुरी, अल्टरनेरिया रोगास व गादमाशी किडीस ही जात प्रतिकारकक्षम आहे.

## कोरडवाहू शेतीत चिंच लागवड ठरेल फायदेशीर

जर आपण चिंच लागवडीचा विचार केला तर हव्या त्या प्रमाणात चिंचेचे लागवड क्षेत्र नाही. परंतु कोरडवाहू शेतीसाठी चिंच लागवड एक वरदान ठरू शकते. चिंच लागवडीत जास्त काही व्यवस्थापनावर लक्ष केंद्रित करण्याची गरज नसून एक जमिनीची निवड आणि चिंचेच्या प्रमुख जाती इत्यादी गोष्टी माहित असणे आवश्यक आहे. चिंचेची लागवड पद्धत आणि खत व्यवस्थापन यावर विशेष लक्ष दिले तर चिंच लागवड एक वरदान ठरू शकते. तुम्हाला जर चिंचेचे रोप किंवा कलम यांचे लागवड करायची असेल तर त्यासाठी एक बाय एक बाय एक मीटर आकाराचे खड्डे खोदून घ्यावेत.

ज्या वेळेस तुम्ही एकटे भराल त्यावेळी खड्ड्याच्या तळाशी दहा ते पंधरा सेंटीमीटर उंचीपर्यंत पालापाचोळा टाकावा व त्यानंतर चांगले कुजलेले शेणखत अंदाजे पंधरा किलो, नत्र, स्फुरद आणि पालाश या मुख्य



अन्नद्रव्ये यांचे मिश्रण शंभर ग्रॅम आणि २०० ग्रॅम निंबोळी आणि माती यांचे मिश्रण करून खड्डे भरावेत. खड्डे भरताना मातीत १०० ग्रॅम कीडनाशक पावडर मिसळली तर फायद्याचे ठरते. एक दोन चांगले पाऊस पडल्यानंतर रोप किंवा कलमांची मुख्य शेतात लागवड करावी. त्यामुळे पावसाळी दमट हवामानाचा झाडाच्या वाढीसाठी भरपूर फायदा होतो. झाडाचे मर कमी होते व झाडाची वाढ जोमदार होते. उन्हाळ्यामध्ये आवश्यक ओलावा टिकून राहावा यासाठी हा यामध्ये वाळलेले गवत, पाचटाचे आच्छादन किंवा भुसा वगैरे यांचा वापर फायद्याचा ठरतो. चिंचेच्या झाडाची वाळवी किंवा मूळकूज इत्यादीपासून बचाव करण्यासाठी शिफारसीत बुरशीनाशक व कीटकनाशकांचे आळवणी प्रत्येक रोपाच्या आळ्यात करावी. चिंचेच्या झाडाला वळण देणे खूप महत्त्वाचे आहे. यासाठी जेव्हा झाड एक मीटर उंचीची होईल तेव्हा त्याचा शेंडा खुडावा. कारण यामुळे चारी दिशांना चिंचेच्या फांद्यांची वाढ होते व आकार देखील डेरेदार होतो.चिंचेच्या झाडाची इतर फळबाग प्रमाणे नियमित छाटणी करण्याची आवश्यकता नाही. आत्ता जेव्हा तुम्ही दरवर्षी चिंचा तोडल्यानंतर झाडावर जे काही वाळलेल्या फांद्या असतात त्या कापून काढाव्यात.जेव्हा चिंच काढणी पूर्ण झाल्यानंतर बागेला पाण्याचा चांगला ताण द्यावा. यामुळे फुलधारणा जास्त प्रमाणात होते व फुलांचे रूपांतर फळांमध्ये झाल्यानंतर पाणी द्यावे.

## जास्तीत जास्त उत्पादन देणाऱ्या जाती

तांदूळ, गहू आणि उसानंतर बटाटा हे भारतातील सर्वात जास्त लागवड केलेले पीक आहे. बटाट्याला भाज्यांचा राजा देखील म्हटले जाते. तांदूळ, गहू आणि उसानंतर बटाटा हे भारतातील सर्वात जास्त लागवड केलेले पीक आहे. बटाट्यामध्ये ८० ते ८२ टक्के पाणी आणि १४ टक्के स्टार्च असते. ही अशी भाजी आहे जी कितीही दिवस साठवता येते. त्याच वेळी, बटाट्याचे अनेक पदार्थ बनवता येतात. कदाचित त्यामुळेच याला भाज्यांचा राजा असेही म्हणतात. खरं तर, बटाट्याच्या पराठ्यापासून ते चिप्सपर्यंत आणि इतर अनेक प्रकारच्या भाज्या बनवल्या जातात ज्या सर्वांना आवडतात. बहुतांश शेतकरी बटाट्याची लागवड पारंपरिक बियाण्यांवरच करतात. ते शेतकरी आता चांगल्या उत्पादनासाठी चांगल्या जातीची लागवड करून चांगला नफा मिळवू शकतात.

बटाट्याची लागवड करायची असेल तर तुम्ही बटाट्याच्या काही प्रगत जातींची लागवड करू शकता. यामध्ये सुधारित वाणांचा समावेश आहे. कुफरी पुखराज जाती, कुफरी सिंदूरी जाती, कुफरी चिप्सोना, कुफरी अलंकार आणि कुफरी नीलकंठ या जातींची लागवड करून चांगला नफा मिळवता येतो.



कुफरी पुखराज वाण : ही जात उत्तर भारतातील मैदानी भागात कमी कालावधीत तयार होणारी बटाट्याची सर्वात खास जात आहे. त्याची लागवड उत्तर भारतात सर्वाधिक आहे. विशेषतः या जातीची लागवड उत्तर प्रदेश, बंगाल, बिहार, पंजाब, हरियाणा,महाराष्ट्र, गुजरात, झारखंड, छत्तीसगड आणि ओडिशा येथे केली जाते. या जातीची चांगली गोष्ट म्हणजे ही वाण पेरणीनंतर १०० दिवसांत तयार होते.कुफरी चिप्सोना प्रकार : बटाट्याची ही जात चिप्स बनवण्यासाठी खूप प्रसिद्ध आहे. ही जात चिप्स बनवण्यासाठी योग्य मानली जाते. भारतातील उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगालमध्ये या जातीची लागवड केली जाते. बटाट्याच्या या जातीमध्ये शेतकऱ्याला हेक्टरी ३०० ते ३५० क्विंटल उत्पादन मिळते.

कुफरी अलंकार वाण : ही बटाट्याची प्रगत जात असून ते प्रति हेक्टरी २०० ते २५० क्विंटल उत्पादन देते. या जातीचे बटाट्याचे पीक केवळ ७० दिवसांत तयार होते. ही जात उत्तर भारतातील मैदानी प्रदेशात चांगले उत्पादन देते.ब्लड शुगर : टाइप १ आणि टाईप २ मधुमेह असलेल्या रुग्णांनी, नाशपाती खाल्याने मधुमेह होईल नष्ट जाणून घ्या कसे सेवन करावे

कुफरी नीलकंठ वाण : ही अँटिऑक्सिडंट्सने समृद्ध असलेल्या बटाट्याची सर्वोत्कृष्ट वाण आहे, जी खूप थंड हवामान सहन करू शकते. त्याची उत्पादन क्षमता इतर जातींपेक्षा जास्त आहे. या जातीचे पीक ९० ते १०० दिवसांत तयार होते. याशिवाय हा बटाटा चवीलाही चांगला लागतो. दुसरीकडे, ही जात उत्तर भारतातील मैदानी प्रदेशांसाठी चांगली मानली जाते.

कुफरी सिंदूरी वाण : कुफरी सिंदूरी ही बटाट्याची प्रगत जात आहे, जी दंव सहन करू शकते. मैदानी आणि डोंगराळ भागात याची लागवड मोठ्या प्रमाणावर केली जाते. डोंगराळ भागापेक्षा मैदानी भागात पीक लवकर तयार होते. ही जात १२० ते १२५ दिवसांत तयार होते.




### महत्वाच्या घटना

७०८ : ७०८ई.पुर्व : जपानमध्ये पहिल्यांदा तांब्याची नाणी बनवली गेली. (पारंपारिक जपानी तारीख: १० ऑगस्ट ७०८)
१४९८ : वास्को द गामाने कालिकतहुन पोर्तुगालला परतण्याचा निर्णय घेतला.
१८२५ : पोर्तुगालने ब्राझिलच्या स्वातंत्र्याला मान्यता दिली.
१८३१ : मायकेल फॅरेडे याने विद्युत चुंबकीय प्रवर्तनाचा शोध लावला.
१८३३ : युनायटेड किंगडमने आपल्या साम्राज्यात गुलामगिरीवर बंदी घातली.
१८९८ : गुडईयर कंपनीची स्थापना झाली.
१९१८ : लोकमान्य टिळक यांनी मुंबई येथे काँग्रेसचे विशेष अधिवेशन बोलावले.
१९४७ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर घटना समितीचे अध्यक्ष झाले.
१९६६ : द बीटल्स यांनी शेवटचा स्टेज शो केला.
१८९८ : 'गुडईयर' कंपनीची स्थापना झाली.
१९७४ : चौधरी चरणसिंग यांनी 'भारतीय लोक दल' या राजकीय पक्षाची स्थापना केली.
२००४ : मायकेल शुमाकर यांनी पाचव्यांदा फॉर्मुला वन ड्राईव्हर्स चॅम्पियनशिप जिंकले.
२०१३ : राष्ट्रीय क्रीडा दिन

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७८० : नव-अभिजात फ्रेंच चित्रकार ज्यॉंओगूस्ट डोमिनिक अँग्र यांचा जन्म.
१८३० : आर्जेन्टिनाचे राष्ट्रपिता हुआनबॉतिस्ता अल्बेर्डी यांचा जन्म.
१८६२ : ऑस्ट्रेलियाचे वे५ पंतप्रधान अँड्रु फिशर यांचा जन्म.
१८८७ : भारतीय डॉक्टर आणि राजकारणी जीवराज नारायण मेहता यांचा जन्म. (मृत्यू: ७ नोव्हेंबर १९७८)
१८८० : लोकनायक माधव श्रीहरी तथा 'बापूजी' अणे. (मृत्यू: २६ जानेवारी १९६८). पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित प्रख्यात भारतीय शिक्षणतज्ञ, स्वातंत्र्यसेनानी, आधुनिक संस्कृत कवी आणि राजकारणी
१८८७ : ब्रिटीश कालीन भारतातील प्रख्यात चिकित्सक व देशसेवक तसचं, गुजरात राज्याचे पहिले मुख्यमंत्री सेवक जीवराज मेहता यांचा जन्मदिन.
१९०१ : पद्मश्री विठ्ठलराव एकनाथराव विखे पाटील सहकारमहर्षी (मृत्यू: २७ एप्रिल १९८०)
१९०५ : मेजर ध्यानचंद हॉकीचे जादुगार म्हणून प्रसिद्ध असलेले भारतीय सुवर्णपदक विजेता हॉकीपटू (मृत्यू: ३ डिसेंबर १९७९)
१९१५ : इन्ग्रिड बर्गमन स्वीडीश अभिनेत्री (मृत्यू: २९ ऑगस्ट १९८२)
१९२३ : रिचर्ड ॲटनबरो इंग्लिश निर्माते, दिग्दर्शक व अभिनेते
१९४९ : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित प्रख्यात भारतीय अवकाश वैज्ञानिक व भारतीय अवकाश संशोधन संस्था इस्रो चे प्रमुख व माजी अध्यक्ष, तसचं अवकाश आयोगाचे माजी अध्यक्ष, के. राधाकृष्णन यांचा जन्मदिन.
१९५८ : मायकेल जॅक्सन जगप्रसिद्ध अमेरिकन पॉप गायक, गीतलेखक, संगीतकार, निर्माता, आणि अभिनेता (मृत्यू: २५ जून २००९)
१९५९ : दक्षिण भारतीय चित्रपट अभिनेता अक्किनेनी नागार्जुन यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५३३ : पेरूचा शेवटचा इंका राजा अताहु आल्पा यांचे निधन.
१७८० : पंथीयन चे सहरचनाकार जॅकजर्मन सोफ्लॉट यांचे निधन. (जन्म: २२ जुलै १७१३)
१८९१ : सायकल चे शोधक पियरे लेलेमेंट यांचे निधन. (जन्म: २५ ऑक्टोबर १८४३)
१९०४ : ओट्टोमन सम्राट मुराद (पाचवा) यांचे निधन.
१९०६ : बाबा पद्मनजी मुळे ख्रिस्ती धर्मप्रसारक, ग्रंथकार व मराठी ख्रिस्ती वाङ्मयाचे जनक (जन्म: ? मे १८३१)
१९६९ : मेहबूब हुसेन पटेल ऊर्फ 'शाहीर अमर शेख' लोकशाहीर (जन्म: २० आक्टोबर १९१६)
१९७५ : इमॉन डी व्हॅलेरा आयर्लंड प्रजासत्ताकाचे पहिले राष्ट्राध्यक्ष (जन्म: १४ आक्टोबर १८८२)
१९७६ : काझी नझरुल इस्लाम स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारक व हिंदु मुस्लिम ऐक्याचे समर्थक असलेले बंगाली कवी. पश्चिम बंगालमधील असनसोल-दुर्गापूर येथील आंतरराष्ट्रीय विमानतळाला त्यांचे नाव देण्यात येणार आहे. (जन्म: २५ मे १८९९)
१९८२ : इन्ग्रिड बर्गमन स्वीडीश अभिनेत्री (जन्म: २९ ऑगस्ट १९१५)
१९८६ : गजानन श्रीपत तथा 'अण्णासाहेब' खेर महाराष्ट्रीयन मराठी शिक्षणतज्ञ व पुणे येथील महाराष्ट्र विद्यालयाचे संस्थापक तसचं, पुणे विद्यार्थी गृहाचे संस्थापक सदस्य (जन्म: १५ जून १८९८)
२००७ : बनारसी दास गुप्ता ब्रिटीश राजवटील प्रसिद्ध भारतीय स्वातंत्र सेनानी, भारतीय राजकारणी व हरियाणा राज्याचे माजी चौथे मुख्यमंत्री (जन्म: ५ नोव्हेंबर १९१७)
२००८ : जयश्री गडकर सुप्रसिद्ध भारतीय हिंदी आणि मराठी चित्रपट अभिनेत्री (जन्म: २१ फेब्रुवारी १९४२)

# जायकवाडीच्या पाण्यासाठी पुढाकार घेणार- खा. काळे

अबड । प्रतिनिधी

तालुक्यातील अवर्षण प्रवण भागाला विशेष बाब म्हणून सरकारने जायकवाडीतुन पाणी दिले पाहिजे यासाठी आम्ही पुढाकार घेतला आहे. जायकवाडीच्या पाण्यासाठी आम्ही सभागृहात सरकारला जाब विचारणार आहोत पावसाळ्यात टँकरने पाणी पुरवठा करावा लागतो सरकारसाठी यासारखी दुर्दैवी बाब नसल्याचे प्रतिपादन खासदार डॉ.कल्याण काळे यांनी अध्यक्षीय भाषणात केले. जायकवाडी पाणी मागणी संघर्ष समितीच्या जनसंवाद यात्रेचा समारोप कार्यक्रम जळगावकर नाट्यगृहात दि.२८ रोजी आयोजित करण्यात आला होता.शहरातील नागरिकांनी जनसंवाद यात्रेचे तोफांच्या आतीषबाजीमध्ये ठिकठिकाणी स्वागत करीत महिलांनी औक्षण केले.यावेळी खा.कल्याणराव काळे,आ.राजेश टोपे,मनोज पा.जरांगे,मा.आ.शिवाजीराव चोथे,संतोष सांबरे सह

जायकवाडीचे सेवानिवृत्त अभियंता शंकरराव नागरे,जयसिंह हिरे,पंजाबराव डक,अप्पासाहेब निर्मळ प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.जरांगे पा.म्हणाले की सरकारने शेतकऱ्यांना शेतीसाठी मुबलक पाणी द्यावे, वीज द्यावी, बी बियाणासाठी कर्ज उपलब्ध



करुन द्यावे याशिवाय शेतकऱ्यांना काही नको पाण्याविना कशी शेती करावी शेतकऱ्यांना शेती जीवन मरणाचा प्रश्न झाला असुन यातून त्यांना बाहेर काढण्यासाठी सरकारने शेतकरी पुत्र म्हणून पाणी, वीज,कर्ज उपलब्ध करुन द्यावे. माझा लढा आरक्षणासाठी जरी असला तरी तालुक्यात निघालेल्या जनसंवाद यात्रेच्या आंदोलनात सहभागी होण्यासाठी मी शेतकरीपुत्र म्हणून उपस्थित असल्याचे म्हटले.संघर्ष समितीचा लढा योग्य असुन सर्वपक्षीय लोकांनी पुढाकार घेत सरकार आणि विरोधी पक्षाच्या माध्यमातून जायकवाडीच्या पाण्यासाठी पाठपुरावा सुरू केला हे कौतुकास्पद आहे.समितीचा सदस्य म्हणून मी या लढ्यात सहभागी असल्याचे प्रतिपादन यावेळी आ.राजेश टोपे यांनी केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक समितीचे अध्यक्ष अँड.शामसुंदर पाटील यांनी करुन जनसंवाद यात्रेची भूमिका संजय खोरे यांनी व्यक्त केली सुत्रसंचालन रामभाऊ लांडे, शिवप्रसाद चांगले यांनी करुन आभार अँड रतन तारडे यांनी मानले.बप्पासाहेब गोल्डे,चंद्रशेखर मोहरीर,बालासाहेब इंगळे,रविंद्र गोल्डे,कैलास जिगे,शफी पटेल, अँड रतन तारडे,प्रकाश नारायणकर,जाकेर डावरगावकर,जगन दुर्गे,हनुमान धांडे,दिनेश काकडे,राजीव डोंगरे,संजय खोरे,बंडु पागीरे,सिध्दार्थ रोटे,प्रसाद झाडे,गोवर्धन भोरे, पाडुरंग गटकाळ,अय्युब बागवान,पद्माकर कायंदे,बाबासाहेब खांडेभराड, लक्ष्मण गाडेकर,चंद्रहास गायके,नारायण टकले,गणेश वाढेकर,योगेश ढेंबरे, महेश रायकर, शिवाजी जाधव,तुकाराम जामदरे,राम शेळके,विजय शेळके,दादाराव बोंगाने,बापुसाहेब पठाडे,गणेश चिंचखेडे आदीसह विविध क्षेत्रातील लोक उपस्थित होते.जायकवाडीचे सेवानिवृत्त मुख्य अभियंता शंकरराव नागरे यांनी जायकवाडी प्रकल्पाची जलक्षमता,लाभक्षेत्र,पाणी उपलब्धता, सिंचन आदी विषयावर कायदेशीर मार्गदर्शन केले.जायकवाडीचे पाणी मिळवण्यासाठी समितीला अनेक टप्पे पार करावे लागणार असुन सरकारकडे पाठपुरावा करावा लागणार असल्याचे त्यांनी म्हटले.

## माजी आमदार संगीता ठोंबरे यांच्या गाडीवर दगडफेक

### गाडीचा चालक आणि माजी आमदार जखमी



केज । प्रतिनिधी

केज विधानसभेच्या माजी आमदार प्रा. संगीताताई ठोंबरे या केज तालुक्यातील दहिफळ वड माऊली येथील लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त दहिफळ वडगाव येथ गेले असता अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन करून सायंकाळी ६:०० वाजता त्या ऋषी गदळे घरी चहापाण्यासाठी जात असताना विजय उत्तमराव गदळे यांनी त्यांच्या गाडीवर दगडफेक केली. यात गाडीचा ड्रायव्हरच्या बाजूचा काच फुटून तो दगड गाडीचा चालक किशोर बबन मोरे याला लागला.

त्या नंतर तोच दगड गाडीमध्ये बसलेल्या माजी आमदार संगीता ताई ठोंबरे यांना लागून त्याही जखमी झाले आहेत. त्यांच्यावर उपजिल्हा रुग्णालय केज येथे उपचार चालू आहे दरम्यान याप्रकरणी पोलिसात तक्रार नोंदवण्याची प्रक्रिया सुरू आहे.

## थोडक्यात



### महाविकास आघाडीच्या वतीने तहसीलदारांना निवेदन

माजलगांव । प्रतिनिधी

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील छ.शिवाजी महाराज पुतळा अवमान प्रकरणी महाविकास आघाडीच्या वतीने दि २८ ऑगस्ट बुधवार रोजी येथील तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा अवमान झाल्याबद्दल महाविकास आघडीच्या वतीने दि २८ ऑगस्ट बुधवार रोजी निवेदन देण्यात आले.यावेळी महाविकास आघाडीचे भाई गंगाभीषण थावरे पाटील,कचरु तात्या खळगे,मनोहर डाके,शकील कुरेशी,सिताराम क्षीरसागर,नारायण होके,शुभम डाके,मनोज फरके,अभय होके यांच्यासह महाविकास आघाडीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

### शेतरस्त्यासाठी हिवरसिंगा ग्रामस्थ आक्रमक

हिवरसिंगा। प्रतिनिधी



शिरुर कासार तालुक्यातील हिवरसिंगा येथील शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी योग्य रस्ता नसल्याने ग्रामस्थ आक्रमक होऊन मायबाप आम्हाला रस्ता देता का रस्ता अशी म्हणण्याची वेळ येथील ग्रामस्थावर आली आहे तरी पण तहसिलदार शिरूर, बीडीओ शिरूर ग्रामसेवक हे कुठलीच कार्यवाही करित नसल्या कारणाने अखेर हिवरसिंगा अंतर्गत येणा-या मुस्लिम वस्ती,कुटे वस्ती,सानप वस्ती,दूधाळ वस्ती येथील ग्रामस्थांनी तहसिलदार शिरूर कासार बीडीओ शिरूर कासार यांना लेखी तक्रार केली आहे या लेखी तक्रारीत हिवरसिंगा ग्रामस्थांच्या वतीने भिमराव सानप यांनी म्हटले आहे की हिवरसिंगा गावापासुन दैनंदिन कामासाठी शेतात जावे लागते परंतु रस्ता अतिशय खराब असल्या कारणाने या रस्त्यावर चालणे देखील शक्य नाही तर माल वाहातूक कुठून करणार त्यामुळे हिवरसिंगा ते जुना पौंडुळ रस्त्याची प्रत्यक्ष पाहाणी तहसिलदार शिरूर कासार व बीडीओ शिरूर कासार यांनी करून तात्काळ रस्ता दुरूस्त करून द्यावा असे दिलेल्या लेखी तक्रारीत भिमराव सानप व हिवरसिंगा ग्रामस्थांनी म्हटले आहे

### सर्वंकष रक्त चाचणी शिबीर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहराच्या देशपांडे गल्लीतील महाराष्ट्र सांस्कृतिक गणेश मंडळ व अनुकूल आरोग्यधाम यांच्या संयुक्त विद्यमाने सवलतीच्या दरातील सर्वांकष रक्त चाचणी शिबीर ०१ सप्टेंबर रविवार रोजी सकाळी ७ : ०० ते ११:०० या वेळेत देशपांडे गल्लीतील श्रीदत्त संस्थान धाकटे देवघर येथे आयोजित केले असल्याची माहिती देण्यात आली याबाबत डॉ.अतुल देशपांडे म्हणाले की,या शिबीरात जवळपास ६३ प्रकारच्या रक्त चाचण्या मुंबईच्या थायरोकेअर लॅबच्या माध्यमातून अत्यंत सवलतीच्या दरात उपलब्ध होत आहेत सध्याच्या परिस्थितीत वेळोवेळी तपासणी आणि त्यानंतरचे उपचार हे महत्वाचे असतात त्यामुळे या शिबीराचा अवश्य लाभ घ्यावा असेही डॉ.देशपांडे म्हणाले. शिबिराच्या आयोजनासाठी महाराष्ट्र सांस्कृतिक गणेश मंडळाचे पदाधिकारी इतर सदस्य परिश्रम घेत आहेत.

## प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेअंतर्गत प्रस्ताव सादर करावेत-कृषी अधीक्षक

जालना । प्रतिनिधी

केंद्र शासनाच्या आर्थिक मदतीतून प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेअंतर्गत जिल्ह्यात या वर्षी २२८ वैयक्तिक लाभार्थी, ३ गट लाभार्थी, १० सामाईक पायाभुत सुविधा व १ मार्केटिंग व ब्रँडिग प्रस्तावांचे लक्षांक आहे. तरी जालना जिल्ह्यातील इच्छुकांनी प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेअंतर्गत अन्न प्रक्रिया प्रकल्पासाठीचे प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी गहिनीनाथ कापसे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

प्रधानमंत्री सुक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेत अन्न प्रक्रीया उद्योगाच्या पतमर्यादा वाढविणे, उत्पादनांचे ब्रॅडींग व विपणन अधिक बळकट करुन संघटीत साखळीशी जोडणे, सामाईक पायाभुत सुविधा, साठवणुक, पॅकेजिंग, विपणन तसेच उद्योग वाढीसाठीच्या सर्वंकष सेवांचा सुक्ष्म उद्योगांना अधिक लाभ मिळवून देणे या योजनेंचे प्रमुख उद्देश आहेत. शेती आणि शेतीसंबंधीच्या मालावर प्रक्रिया उद्योगास वैयक्तिक लाभार्थीसाठी एकुण प्रकल्प किंमतीच्या ३५ टक्के अधिकाधिक १० लाखांचे अनुदान दिले जाते. राज्य शासनाच्या कृषी विभागातर्फे ही योजना २०२० पासून राबविली जात आहे. वर्ष २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी योजनेंतर्गत २२८ वैयक्तीक लाभार्थी, ३ गट लाभार्थी, १० सामाईक पायाभुत सुविधा व १ मार्केटिंग व ब्रँडिग प्रस्तावांचे लक्षांक प्राप्त झाले आहे.

यंदाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी कृषी प्रशासन प्रयत्न करीत आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी या संकेतस्थळावर अर्ज करणे आवश्यक आहे. शेवटची मुदत नाही. वर्षभरात कधीही अर्ज करता येईल. वैयक्तिक, शेतकरी, युवक, उद्योजक,शेतकरी बचत गट, महिला बचत गट, संस्था, ॲग्रो कंपनी यापैकी कोणालाही अर्ज करता येईल. शेती नसली तरी याचा लाभ घेता येणार आहे. प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजनेंतर्गत शहरी तसेच ग्रामीण भागात रोजगारांची ही चांगली संधी आहे. विविध सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांच्या निर्मितीकरिता शासनामार्फत अर्थबळ मिळत आहे. त्यामुळे या संधीचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा. असेही जिल्हा कृषी अधिक्षक श्री कापसे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## अश्वत्थलिंग यात्रा उत्सवाची महंत महादेवानंद भारती महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने उत्साहात सांगता

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील पंचक्रोशीतील भाविक-भक्तांचे श्रध्दास्थान असलेल्या श्री.क्षेत्र अश्वत्थलिंग महादेव मंदिर येथील श्रावणी चौथा सोमवार यात्रा उत्सवाची दि. २६/०८/२०२४ सोमवार रोजी मठाधिपती महंत गुरुवर्य श्री.स्वामी महादेवानंद भारती महाराज यांच्या सुश्राव्य काल्याच्या किर्तनाने झाली. प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी श्री.क्षेत्र अश्वत्थलिंग महादेव मंदिरात दि.१९ ते २६/०८/२४ दरम्यान अखंड विना वादन सप्ताह व यात्रा उत्सव मोठया भक्तिमय वातावरणात संपन्न होवून या वर्षी चौथा श्रावणी सोमवार याच रोजी श्रीकृष्ण जयंती (उपवास) असल्याने भाविक-भक्तांना मोठी पर्वनी ठरली.हा योग आल्याने या ठिकाणी भाविक-भक्तांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती.यात्रेला सुध्दा दरवर्षीपेक्षा जास्त गर्दी झाल्याचे चित्र पहावयास मिळाले.

किर्तनातून ह.भ.प.महादेवानंद भारती महाराज यांनी काला म्हणजे काय व काल्याची परंपरा कशी आहे याचे सविस्तर वर्णन किर्तनातून सांगितले. तसेच भगवान श्रीकृष्णाचा अगाध महिमा सांगून काल्याचा प्रसाद किती श्रेष्ठ आहे व हा प्रसाद प्रत्येकांनी घेतला पाहिजे.काल्याच्या किर्तनानंतर भाविक-भक्तांनी शाबुदाणा खिचडीच्या महाप्रसादाचा लाभ घेतला.या ठिकाणी चौथ्या श्रावणी सोमवार यात्रा उत्सवाचा महाप्रसाद मागील वर्षी प्रमाणे याही वर्षी अंमळनेर जि.प.गटाचे भाजपा युवा नेते भाऊसाहेब (अण्णा) भवर यांच्या वतीने देण्यात आला.भवर हे माजी मंत्री,मा.आमदार सुरेश धस यांचे कट्टर एकनिष्ठ कार्यकर्ते असून ते अनेक ठिकाणच्या देवस्थानासाठी देणगी, तसेच सप्ताह सोहळ्याला पंगती देऊन अन्नदान करतात.त्यामुळे त्यांची जिल्हाभर चर्चा होत आहे.त्यांच्या या धार्मिक कार्यातील सहभागामुळे व राजकीय क्षेत्रात करीत असलेल्या कामामुळे त्यांचा अंमळनेर जि.प.गटात मोठा जनसंपर्क आहे.तसेच माजी आमदार सुरेश धस यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम राबवित असल्यामुळे माजी आमदार सुरेश धस यांच्या करिता अहोरात्र परिश्रम घेणारा कार्यकर्ता म्हणून भाऊसाहेब भवर यांचा सामान्य जनतेपर्यंत परिचय आहे.त्यामुळे सुरेश आण्णा धस यांना आगामी विधानसभा निवडणुकीसाठी भाऊसाहेब भवर यांच्या माध्यमातून मोठे सहकार्य मिळणार यात तिळमात्र शंका नाही. श्री.क्षेत्र अश्वत्थलिंग यात्रा उत्सव सांगता सोहळा काल्याच्या किर्तनाला ह.भ.प.परमानंद महाराज भारती,ह.भ.प.शिवानंद महाराज भारती,भाजपा युवा नेते भाऊसाहेब भवर,शरद पवार राष्ट्रवादी युवक प्रदेश अध्यक्ष महेबूब शेख,राजीव नौथर पैठण,तसेच परिसरातील आजी-माजी सरपंच,उपसरपंच,ग्रामपंचायत सदस्य, चेअरमन,पत्रकार तसेच भाविक-भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## लहूजी सेनेचा जिल्हास्तरीय मेळावा: सतीश घाटगे यांना जाहीर पाठींबा

जालना । प्रतिनिधी

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साहित्यरत्न लोकशाहीर आणणाभाऊ साठे यांच्यासह सर्व बहुजनांच्या महापुरुषाना अभिप्रेत असलेली दलित-वंचित-बहुजन समाजाची प्रगती आणि विकास अजूनही झालेला नाही. आजही मातंग आणि बहुजन समाज मुख्य प्रवाहात आलेला नाही.म्हणून दलित-वंचित-बहुजन समाजाचा केवळ राजकारणासाठी वापर करणाऱ्या प्रस्थापित राजकारण्यांना जागा दाखवून येणाऱ्या काळात परिवर्तन घडवा, असे आवाहन भाजपा नेते सतीश घाटगे पाटील यांनी बहुजन समाजाला केले.

जालना तालुक्यातील विरेगाव येथे भाजपा नेते तथा घनसावंगी विधानसभेचे निवडणूक प्रमुख सतीश घाटगे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत लहूजी सेनेने मातंग समाजाचा जिल्हा स्तरीय मेळावा घेतला. केलापरिवर्तनाची दिशा ठरविण्यासाठी वंचित, दलितांच्या न्याय, हक्कासाठी आणि बहुजन समाजाच्या भविष्यासाठी येणाऱ्या काळात घनसावंगी विधानसभेतील बहुजना समाजाला न्याय देणाऱ्या नेतृत्वाच्या पाठीशी उभा राहण्याचा निर्धार मातंग व बहुजन समाजाने केला.जालना तालुक्यातील विरेगाव येथे लहूजी सावळे बहुजन क्रांती सेनेचे अध्यक्ष राधाजी शेळके, उपाध्यक्ष गणपतजी



कांबळे व भाजपा नेते तथा घनसावंगी विधानसभेचे निवडणूक प्रमुख सतीश घाटगे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत मातंग व बहुजन समाजाचा जिल्हा स्तरीय मेळावा पार पडला या मेळाव्यात ते बोलत होते. लोकशाहीर, साहित्यसम्राट आणणाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त क्रांतीगूरू लहूजी साळवे बहुजन क्रांती सेनेच्या वतीने हा मेळावा आयोजित करण्यात आला होता.यावेळी घाटगे पाटील यांनी समाज बांधवासोबत संवाद साधला. दलित-वंचित-बहुजन समाजाचा प्रस्थापितांनी केवळ राजकारणासाठी वापर केला. त्यांना त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवलं आहे. आजही मातंग आणि बहुजन समाज समाजाच्या मुख्य प्रवाहात आलेला नाही. म्हणून प्रस्थापितांना या निवडणुकीत जागा दाखवून आपल्या पुढच्या पिढीच्या भविष्यासाठी परिवर्तनाला साथ देण्याचे आवाहन केले. वंचित, दलितांच्या न्याय- हक्कासाठी आणि बहुजन समाजाच्या हितासाठी येणाऱ्या काळात घनसावंगी विधानसभेत समाजाच्या विकासाचे व्हिजन असलेल्या सतीश घाटगे पाटील यांनाच बहुजन समाज साथ देणार असा विश्वास राधाजी शेळके, गणपतजी कांबळे यांनी दिला.या मेळाव्यास लहूजी साळवे बहुजन क्रांती सेनेचे युवा नेते शिवबाजी शेळके, मराठवाडा सचिव बाबासाहेब पाटोळे उपाध्यक्ष रमेश दाभाडे,महिला आघाडीच्या मराठवाडा अध्यक्ष कासाबाई शिर्गुळे,चंद्रकला गवळी,सर्जेराव पाटोळे यांच्यासह सर्व पदाधिकारी व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मंठ्यात प्रशिक्षणार्थी महिला मुख्याधिकाऱ्याचा विनयभंग

जालना । प्रतिनिधी

मंठा नगर पंचयातमध्ये प्रशिक्षणार्थी मुख्याधिकारी म्हणून २६ ऑगस्ट रोजी एक ३८ वर्षीय महिला अधिकारी रुजू झालेल्या आहेत . नुकत्याच रुजू झाल्यामुळे त्यांची तात्पुरती निवासव्यवस्था मंठा मध्ये शासकीय विश्रामगृहातील एका शासकीय रूम करण्यात आलेली आहे. सदर महिला अधिकारी आपल्या रूममध्ये थांबलेल्या असतांना दोन इसम त्यांच्या शासकीय रूममध्ये प्रवेश केला. त्यापैकी एकाने म्हणाले की मी डीपीटीसी मेम्बर आहे, आम्ही तुम्हाला सहकार्य करण्यासाठी आलो आहोत, असे सांगितले. त्यावेळी सदर महिला अधिकाऱ्याने मला तुमच्या सहकार्याची गरज नाही, असे म्हणत रूम मधून बाहेर जाण्यास सांगितले.

तरीही त्या दोघांनी रूम मधून बाहेर न जाता रूम मध्येच थांबून सदर महिला अधिकाऱ्यांच्या मनास लज्जा वाटेल असे वर्तन करून, विनयभंग केला. याप्रकरणी मंठ्यामध्ये घडलेला प्रकार या संदर्भात सहाय्यक पोलीस निरीक्षक भारती यांना विचारले असता ते म्हणाले की मी बिझी आहे व कामात आहे असे बोलून माहिती देण्यास टाळले याबाबत या घटनेविषयी उलट सुलट चर्चा आहे असं बोलल्या जात आहे या प्रकरणी. सदरील महिलेने

तातडीने जालना येथे येऊन जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ आणि अप्पर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार यांची भेट घेऊन, घडलेले घटनेची सविस्तर माहिती सांगितली. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल यांच्याशी संपर्क साधून तात्काळ गुन्हा नोंदविण्याची सूचना केली. त्यानुसार काल रात्री उशिरा कदीम जालना पोलीस ठाण्यात सदर महिला अधिकाऱ्यांच्या फिर्यादीवरून संशयित आरोपी भाऊसाहेब गोरे व त्याचा एक साथीदार अशा दोन जणांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या ७४, ३२९ (१), ३ (५) कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हा पुढील तपासासाठी मंठा पोलिसांकडे वर्ग करण्यात आला आहे. तपास सहायक पोलीस निरीक्षक भारती हे करीत आहेत.

# शुन्य मशागत तंत्रज्ञानाच्या प्रक्षेत्राला कृषी सहसंचालक डॉ. तुकाराम मोटे यांची भेट

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबेजोगाई उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालयांतर्गत केज, परळी, अंबेजोगाई तालुक्यातील गावांमध्ये नानाजी देशमुख कृषी संजीवनी (पोकरा) प्रकल्पांतर्गत शून्य मशागत तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याबाबत जनजागृती करण्यात येत आहे. सदर उपक्रमांतर्गत परळी तालुक्यातील नागापूर येथे पोकरा प्रकल्पाचे मृदा विशेषज्ञ विजय कोळेकर व शेतीशाळा समन्वयक शिवप्रसाद येळकर यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकरी तुकाराम सोळंके यांनी शुन्य मशागत तंत्रज्ञानाचा अवलंब केलेल्या प्रक्षेत्राला छत्रपती संभाजीनगर कृषी विभागाचे विभागीय कृषी सहसंचालक डॉ. तुकाराम मोटे यांनी भेट

तुकाराम सोळंके यांनी केला शून्य मशागत तंत्रज्ञानाचा अवलंब



देऊन पाहणी करून उपस्थित शेतकऱ्यांना तंत्रज्ञानाचे झालेले फायदे विस्तृतपणे समजावून सांगितले. शेतकरी तुकाराम सोळंके यांनी उन्हाळी हंगाम २०२४ मध्ये चार फुटाचे सरी वरंबे तयार करून वरंब्यावर टोकण यंत्राच्या साह्याने तीळ लागवड केली. उन्हाळी तीळ कापणी केल्यानंतर तीळ पिकाचे उर्वरित अवशेष वरंब्यावर तसेच ठेवून कोळेकर व येळकर यांनी सांगितल्याप्रमाणे उन्हाळ्यामध्ये कोणत्याही प्रकारची मशागत न करता जून महिन्यामध्ये पाऊस पडल्यानंतर ग्लायफोसेट तणनाशकाची फवारणी करून तण व्यवस्थापन केले व नंतर कापूस पिकाची टोकण यंत्राच्या साह्याने लागवड केली. कापूस लागवड केल्यानंतर लगेच पेंडिमेथालिन ३० ईसी या उगवणपूर्व नाशकाची फवारणी केली व त्यानंतर शिफारशीतील तणनाशकांचा अवलंब करून तण व्यवस्थापन केले कापूस पिकामध्ये कुठल्याही प्रकारची बैलचलित अथवा मनुष्यचलित खुरपणी, कोळपणी अशी मशागतीची कामे केली नाही यामुळे त्यांच्या उत्पादन खर्चामध्ये बचत होण्यास मदत झाल्याचे शेतकरी सोळंके यांनी अनुभव व्यक्त केले. शिफारशीतील तण नाशकांचा वापर करून तण शेतामध्येच कुजवल्यामुळे सूक्ष्म जीवाणूंची संख्या वाढून जमिनीची सुपीकता वाढते तसेच उत्पादन खर्च कमी होतो याबाबत डॉ मोटे यांनी शेतकरी तुकाराम सोळंके यांचे उदाहरण देऊन शेतकऱ्यांना शून्य मशागत तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचे आवाहन केले. यावेळी कृषी सहाय्यक पवार व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुख्यमंत्री योजनेचा लाभ गोरगरीबांच्या घरात पोहचवा -अनिलदादा जगताप

## मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत ट्रेनी शिक्षकांच्या निवडीसाठी गरजवंत उमेदवारास प्राधान्य द्यावे

बीड । प्रतिनिधी

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत ग्रामीण भागात प्रती शाळा एक प्रशिक्षणार्थी या प्रमाणे सुयोग्य व पात्र उमेदवारांची कागदपत्रे प्राप्त करून शाळेकरिता एका प्रशिक्षणार्थी ट्रेनी शिक्षकांची निवड करायाची आहे. मात्र संबंधित अधिकारी सरपंच व इतर लोकांच्या दबावाखाली येऊन स्वतःची नातलग संबंधी यांनाच गरज नसताना या योजनेचा फायदा करून देत आहेत. यामुळे तळागाळातील गरजू लोकांची हेळसांड होत असून या योजनेसाठी सर्वोपरी पात्र असलेल्या गोरगरीब कुटुंबातील उमेदवारास लाभ होत नसल्याच्या तक्रारी शिवसेना कार्यलयात आल्या आहेत. महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे साहेब सर्व सामान्य जनतेच्या हितासाठी योजना राबवत आहेत, त्या आमलात आणत आहेत. मात्र काही अधिकारी दबावतंत्रास बळी पडून गोरगरीब आणि गरजू माणसांच्या तोंडातला घास काढून नाते संबंधातील अपात्र उमेदवारास भरवत आहे. त्या सर्व अधिकाऱ्यांना माझे कळकळीचे आवाहन आहे की, त्यांनी कुणाच्याही दबावाखाली न येता मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत ग्रामीण भागात प्रती शाळा एक प्रशिक्षणार्थी या प्रमाणे सुयोग्य व पात्र उमेदवारांची कागदपत्रे प्राप्त करून नियम अटींनुसारच शाळेकरिता एका प्रशिक्षणार्थी ट्रेनी शिक्षकांची निवड करावी. जर आपल्यावर कुणी दबाव टाकत असेल तर याची माहिती आम्हाला द्यावी. मात्र कुणाच्या दबावाखाली येऊन अपात्र उमेदवाराची निवड करू नये. अन्यथा शिवसैनिकांशी गाठ असेल आणि त्यांना शिवसेना स्टाईलनेच उत्तर देण्यात येईल असे शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी माध्यमांना पत्रक जारी करत अधिकाऱ्यांना सूचना आवाहन करून कडक इशारा दिला आहे.



### गरजवंत आणि पात्र उमेदवाराची हेळसांड कदापि सहन करणार नाही- जगताप

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत ग्रामीण भागात प्रती शाळा एक प्रशिक्षणार्थी या प्रमाणे सुयोग्य व पात्र उमेदवारांची कागदपत्रे प्राप्त करून शाळेकरिता एका प्रशिक्षणार्थी ट्रेनी शिक्षकांची निवड करायाची आहे. मात्र संबंधित अधिकारी सरपंच व इतर लोकांच्या दबावाखाली येऊन स्वतःची नातलग संबंधी यांनाच गरज नसताना या योजनेचा फायदा करून देत आहेत. यामुळे तळागाळातील गरजू लोकांची हेळसांड होत असून या योजनेसाठी सर्वोपरी पात्र असलेल्या गोरगरीब कुटुंबातील उमेदवारास लाभ होत नसल्याच्या तक्रारी शिवसेना कार्यलयात आल्या आहेत. अधिकाऱ्यांनी कुणाच्याच दबावाखाली न येता नियम अटीनुसारच काम करावे आणि मुख्यमंत्री योजनेचा लाभ गोरगरीब गरजवंत पात्र उमेदवारास द्यावा. गरजवंत आणि पात्र उमेदवाराची हेळसांड कदापि सहन करणार नाही असे शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी माध्यमांना जारी केलेल्या पत्रकात म्हंटले आहे.

# हिंदवी स्वराज्य ग्रुपच्या वतीने दहीहंडी उत्साहात साजरी

माजलगाव । प्रतिनिधी

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी शहरातील हानुमान चौकातील हिंदवी स्वराज्य ग्रुपच्या वतीने रवींद्र कुराडे यांच्या अध्यक्षतेखाली दि २७ ऑगस्ट मंगळवार रोजी सायंकाळी दहीहंडी उत्सवात साजरी करण्यात आली.

माजलगाव शहरातील हानुमान चौकातील हिंदवी स्वराज्य ग्रुपच्या वतीने मागील १५ वर्षापासून दहीहंडी उत्सव साजरा करण्यात येतो.यावर्षी देखील हिंदवी स्वराज्य ग्रुपच्या वतीने २७ ऑगस्ट मंगळवार रोजी सायंकाळी ५:३० वाजण्याच्या सुमारास साजरी करण्यात आले. यावेळी हजाराच्या संख्येने गोविंदा प्रेमी,तसेच गोविंदा पथकांची उपस्थिती होती.या कार्यक्रमाचे आयोजक हिंदवी स्वराज्य ग्रुपचे अध्यक्ष रविंद्र मारोतीराव कुऱ्हाडे यांच्या अध्यक्षतेखाली दहीहंडी उत्सवाच्या कार्यक्रमाचे उद्घाटन उद्योजक तथा ओबीसी नेते माधव निर्मळ व शिवाजी रांजवण यांच्या शुभ हस्ते करण्यात आले.यावेळी माजी सभापती कल्याण अबुज,दिपक मुंडे,दत्ता महाजन, अमोल डाके,रामराजे रांजवण,बाळासाहेब क्षिरसागर, चिंचगव्हणचे सरपंच राजअर्जुन, कल्याण शेप,शुभम डाके,ईश्वर खुर्पे, लक्ष्मण गायकवाड, शरद चव्हाण,सुनिल ठोंबरे,कल्याण कसपटे,महादेव गायकवाड.,रवि गायकवाड यांची उपस्थिती होती.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विलास चव्हाण, संजय चव्हाण, लक्ष्मण शिंदे,अमर डक,श्रीकांत झिंजुरके,राहुल चव्हाण,दिपक अलकुंटे यांनी परिश्रम घेतले यावेळी पत्रकार बांधवासह हजारोंच्या संख्येने दहीहंडी प्रेमी तसेच गोविंदा पथक यांनी हजेरी लावली.या प्रसंगी माजलगाव शहरातील जय बजरंग ग्रुप गोविंदा पथक यांनी दहीहंडी फोडून ३१,०००/ हाजार रुपयाचे पारितोषिक जिंकण्याचा मान मिळवला.



# कृषी प्रदर्शनाचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा -डॉ.हरिदास शेलार

पाटोदा । प्रतिनिधी

शेतकऱ्यांचे नेते मा.आ.भिमराव धोंडे यांच्या संकल्पनेतून मराठवाड्यातील सर्वात मोठे आष्टी तालुक्यात दुसऱ्यांदा कृषी प्रदर्शन संपन्न होत आहे.यामध्ये भारतातील सर्वात उंच ५१ लाखाचा सोन्या नावाचा कोसा बैल प्रमुख आकर्षण असणार आहे. यासोबतच लाडक्या बहिणींसाठी उद्धव के.पी. प्रस्तूत महाराष्ट्रभर गाजत असलेला महिला भगिनींचा एकमेव आवडता कार्यक्रम खेळ पैठणीचा, शेतकऱ्यांच्या मनोरंजनासाठी रोज सायंकाळी शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रमा अंतर्गत पारंपारीक लोकगीते, लोककला,नाटक, शास्त्रीय संगीत, शेतकरी गीते, लोकनृत्य यांचे सादरीकरण करण्यात येतील.यासह बरेच काही असणार आहे. शेती व ग्रामीण भागातील बदलत्या तंत्राची महत्त्वपूर्ण माहिती मिळणार असल्याने आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघासह जिल्ह्यातील व्यावसायिक व शेतकरी वर्गाने,कृषी प्रदर्शनाचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन डॉ हरिदास शेलार यांनी केले आहे.आष्टी शहरात मा.आ.भिमरावजी धोंडे साहेब यांच्या संकल्पनेतून मराठवाड्यातील सर्वात मोठे राज्य स्तरीय कृषी प्रदर्शन दि .२९ ऑगस्ट ते १ सप्टेंबर या कालावधीत पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयासमोर कृषी प्रदर्शन सभामंडपात संपन्न होत आहे.या प्रदर्शनाचे उद्घाटन कृषी मंत्री ना. धनंजय मुंडे व लोकनेत्या आ. पंकजाताई मुंडे,आदर्श सरपंच पोपटराव पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.सांगली येथील व देशातील सर्वात उंच ५१ लाख रुपये किमंतीचा खिलार कोसा जातीचा सोन्या बैल प्रदर्शनाचे विशेष आकर्षण ठरणार आहे. कृषी प्रदर्शनाच्या निमित्ताने चार दिवस दररोज दुपारी १२ ते २ या वेळेत कृषी संबंधित तज्ञांचे शेतकऱ्यांना ◀◀ पान ३ वर



# मोठेवाडी फाटा येथे शेकापचा तब्बल दीड तास रास्ता रोको

## शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी हमीभाव द्या-भाई ॲड.नारायण गोले

माजलगाव । प्रतिनिधी

गेल्या दहा वर्षात शेतकरी आणि शेती प्रचंड संकटात असून शेतकरी हजारोंच्या संख्येने आत्महत्या करत असताना शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यायला सरकार तयार नाही याउलट अंबानी अदानी यांना कोट्यावधीच्या खैराती वाटण्यात सरकार व्यस्त आहे, गेल्या दहा वर्षात शेतकऱ्याचा आत्महत्येचा आकडा हजाराच्या संख्येने वाढत असताना त्यावर तोडगा काढायला सरकारकडे वेळ नाही, गेल्या दहा वर्षात झालेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या ह्या केवळ शेतकऱ्याच्या शेतमालाला किफायतशिर हमीभाव न मिळाल्यामुळे झालेल्या असल्याने शेतकऱ्याच्या आत्महत्या रोखण्यासाठी शासनाने शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित किफायतशीर हमीभाव दिला पाहिजे असे मत शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड नारायण गोले पाटील यांनी आंदोलनादरम्यान व्यक्त केले, मोठीवाडी फाटा येथे आज दिनांक २८ ऑगस्ट रोजी सकाळी १०:०० वा शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने भाई ॲड.नारायण गोले पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेकडो कार्यकर्त्यांनी शेतकऱ्यांना सरसकट पिक विमा . शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी ., शेतकऱ्यांच्या शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित किफायतशीर हमीभाव द्या, शेतकऱ्यांना सरसकट अनुदान द्या.,जायकवाडी धरणाचे पाणी माजलगाव धरणात सोडा. लोकनेते कारखान्या कडील थकीत रकमेची पूर्ण रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करा, माजलगाव तालुक्यातील सर्वच पांदण रस्त्याचे मुरूम खडीकरण करा, या मागण्यासाठी तब्बल दीड तास रस्ता रोको आंदोलन करण्यात आले यावेळी आंदोलकांनी प्रचंड घोषणाबाजी करत शासनाचा निषेध व्यक्त केला, त्यावेळी वाहनाच्या तब्बल दीड किलोमीटर रांगा लागल्या होत्या. यावेळी आंदोलकांच्या मागण्याचे निवेदन मंडळ अधिकारी श्री सानप व तलाठी सोळंके यांनी स्वीकारले तर पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त लावला होता, या आंदोलनासाठी शेतकरी कामगार पक्षाचे तालुका चिटणीस भाई मुंजा पांचाळ, शेतकरी कामगार पक्षाचे तालुका सह चिटणीस भाई राहुल सोळंके, शेतकरी कामगार पक्षाचे तालुका सह चिटणीस भाई सतीश शेजुळ, शेतकरी कामगार पक्षाच्या पुरोगामी युवक आघाडीचे तालुकाध्यक्ष भाई अशोक कुलकर्णी, भाई राजेभाऊ शेरकर, भाई राजेश्वर मोरे, भाई माऊली चंदनशिव, भाई सुदाम चव्हाण, भाई लक्ष्मण आप्पा चव्हाण, भाई आनंत चव्हाण, भाई भास्कर कांबळे, संभाजी चव्हाण, वल्लभ वैराळ, अधिक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले यावेळी परिसरातील हजारो बांधवांनी आंदोलनाला उपस्थिती लावली.



# सरदवाडी येथील अक्षय पवार यांचा शॉक लागून मृत्यू

पिंपळवंडी । प्रतिनिधी

विहिरी वरील विद्युत पंपाच्या स्टार्टर पेटीत करंट उतरल्याने विद्युत पंप चालू करण्यासाठी गेलेल्या शेतकरी पुत्राचा विद्युत पंपाच्या पेटीचा शॉक बसून दुर्दैवी मृत्यू झाल्याने सरदवाडी व पिंपळवंडी परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

याविषयी माहिती अशी की,पाटोदा तालुक्यातील सरदवाडी येथील शेतकरी शहादेव सदाशिव पवार यांचा एकुलता एक तरुण मुलगा अक्षय शहादेव पवार वय २४ वर्षे हा वडिलांना शेतात मदत करण्यासाठी दि.२८/०८/२०२४ रोजी सकाळी १०:३० वाजेच्या दरम्यान विहिरीवरील विद्युत मोटार चालू करण्यासाठी गेला असता विद्युत पेटीत करंट उतरल्याने विद्युत पेटीला चिटकून मृत्यू झाल्याची दुर्घटना घडली.शहादेव पवार हे अल्पभूधारक शेतकरी असून त्यांच्या एकुलत्या एक मुलाचा असा अपघाती मृत्यू झाल्याने त्यांचा मोठा आधार गेल्याने त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.चि.अक्षय हा हुशार विद्यार्थी होता तो पोलीस भरतीचा सराव करीत होता.या दुर्दैवी अपघातामुळे त्यांचे पोलीस होण्याचे स्वप्न अधुरे राहिले.त्यांच्या पश्चात आई-वडील व दोन अविवाहीत बहिणी आहेत.अक्षय पवार यांचे शवविच्छेदन करून त्यांच्या पार्थिवावर शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.पुढील तपास अंमळनेर पोलीस स्टेशनचे बीट अमलदार नवनाथ सानप हे करीत आहेत.




# पिक विमा, सरसकट कर्ज माफीसाठी संभाजी ब्रिगेडचे तालुका कृषी अधिकारी कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण

अंबाजोगाई । प्रतिनिधी

सन २०२३ चा प्रधानमंत्री पिक विमा मंजूर करून तो सरसकट देण्यात यावा, शेतकऱ्यांचे सरसकट कर्ज माफ करा, ई-पिक पाहणी अट रद्द करा आणि सन २०२० चा पिक विमा द्यावा या मागण्यांसाठी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रविण उत्तमराव ठोंबरे यांच्या नेतृत्वाखाली मंगळवार, दिनांक २७ ऑगस्ट रोजी तालुका कृषी अधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात आले.

याबाबत संभाजी ब्रिगेडच्या वतीने उपजिल्हाधिकारी, तालुका कृषी अधिकारी यांना यापूर्वी निवेदन देण्यात आले होते. मागील अनेक महिन्यांपासून संभाजी ब्रिगेडने हा विषय लावून धरला आहे. पाठपुरावा सुरू ठेवला आहे. प्रमुख मागण्यांसाठी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रविण उत्तमराव ठोंबरे यांच्या नेतृत्वाखाली मंगळवार, दिनांक २७ ऑगस्ट रोजी तालुका कृषी अधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात आले. शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष कालिदास आपेट यांच्या पुढाकाराने सदरील विषयांकीत प्रश्नासंदर्भात उपोषण स्थळी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रविण उत्तमराव ठोंबरे, तालुका कृषी अधिकारी एस.के.ढाकणे, मंडळ कृषी अधिकारी बी.एस.सूर्यवंशी, कृषी सहाय्यक पंडित काकडे आणि पिक विमा कंपनीचे तालुका प्रतिनिधी अनिकेत पोटभरे, रविंद्र सावंत, रमेश गडदे ◀◀ पान ३ वर



# कृषी दिंडीच्या माध्यमातून अजय धोंडे यांचे आष्टीतील व्यापाऱ्यांना निमंत्रण

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी येथे आजपासून होणाऱ्या मराठवाड्यातील सर्वात मोठया डॉ. स्वामीनाथन राज्यस्तरीय दुसऱ्या कृषी प्रदर्शनाच्या निमित्ताने छत्रपती शाहू, फुले, आंबेडकर, कृषि महाविद्यालयाचे शिक्षक व विद्यार्थ्यांनी आष्टी शहरातून कृषी दिंडी काढून व्यापाऱ्यांना युवा नेते अजय दादा धोंडे यांच्या हस्ते कृषी प्रदर्शनाची निमंत्रण पत्रिका देऊन कृषी प्रदर्शनात सहभागी होण्याचे आवाहन केले.

बुधवारी सकाळी कृषी महाविद्यालयाचे शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थ्यांनींनी कृषी दिंडी काढली. माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या हस्ते श्रीफळ फोडून कृषी दिंडीची सुरुवात झाली. भारतीय जनता पक्षाच्या युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस अजय दादा धोंडे यांनी कृषी दिंडीत सहभागी होऊन आष्टी शहरात फिरून प्रत्येक व्यापाऱ्यांना भेटून निमंत्रण पत्रिका देत कृषी प्रदर्शनात सहभागी होण्याचे आवाहन केले. यावेळी शेतकरी शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. डी. बी. राऊत, प्राचार्य डॉ. श्रीराम आरसुळ, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. कृषी दिंडीमध्ये सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी शेतकरी वेश परिधान केला होता. जय जवान जय किसानच्या घोषणा दिल्या,तसेच हातामध्ये शेती उपयोगी अवजारे व शेती संबंधित साहित्य हातात घेऊन कृषी दिंडीत सहभागी झाले होते. व्यापाऱ्यांनी युवा नेते अजयदादा धोंडे यांचे ठिकठिकाणी स्वागत केले.

# तिसऱ्या वर्षीही तीच क्रेज, तोच उत्साह,तोच जल्लोष

## आप्पासाहेब जाधव यांच्या दहीहंडी उत्सवात तरुणाई झिंगाट!

माजलगाव । प्रतिनिधी

शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख आप्पासाहेब जाधव यांच्या मित्र मंडळाकडून दहीहंडी उत्सव दि २७ ऑगस्ट मंगळवार रोजी धूमधडाक्यात साजरा करण्यात आला.'मच गया शोर सारी नगरी रे..,झिंग-झिंग झिंगाट..,तेरी मटकी तोडेंगे ...'च्या नावाजलेल्या ऑर्केस्ट्राच्या गीतांवर ठेका धरत तरुणाईने दहीहंडी उत्सावाला जल्लोषात रंग भरला होता.या उत्सवामुळे ◀◀ पान ३ वर



# मानवी हक्क अभियानच्या धारूर तालूकाध्यक्षपदी कैलास आडागळे

किल्लेधारूर । प्रतिनिधी

धारूर तालूक्यातील मानवीहक्क अभियान कार्यकर्त्याची व्यापक बैठक राष्ट्रीय अध्यक्ष डा मिलींद आवाड याचे प्रमूख उपस्थीतीत संपन्न होऊन तालुकाध्यक्ष पदी आंबेवडगाव येथील युवककार्यकर्ते कैलास हानूमंत अडागळे यांची निवड एकमताने करण्यात आली आहे. त्यांचे निवडीचे सर्वत्र कौतुक आली आहे.

धारूर तालूक्यातील मानवीहक्क अभियान कार्यकर्त्याची बैठक राष्ट्रीय अध्यक्ष जे एन यु दिल्ली विद्यापिठाचे प्रोफेसर डा मिलीद आवाड याचे अध्यक्षते खाली सपन्न झाली. विवीध विषयावर चर्चा करून संघटनात्मक बाधनी मजबूत करण्याचे ठरवण्यात आले. यावेळी तालूकाध्यक्ष पदी युवक सामाजीक कार्यात सतत अग्रेसर असणारे कैलास हानूमंत आडागळे यांची निवड एकमताने करण्यात आली. तालूक्यात ग्रामपातळी पर्यत संघटनात्मक ◀◀ पान ३ वर



# आर्थिक स्वार्थासाठी पक्ष सोडून गेलेल्या गद्दारांना समाज कधीच माफ करणार नाही -बदामराव पंडित

गेवराई । प्रतिनिधी

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे मुख्यमंत्री म्हणून महाराष्ट्रात चांगले काम करत असताना, स्वार्थासाठी काही नेत्यांनी शिवसेनेसोबत गद्दारी केली. त्यांना सामान्य जनतेने लोकसभेत जागा दाखवली. त्याचप्रमाणे गेवराई विधानसभा मतदारसंघातही विरोधकांकडून शिवसैनिकांना वेगवेगळी आर्थिक आमिषे आणि कारवाईची भीती दाखवून फोडण्याचे काम सुरू आहे. त्याला गोरगरिबांशी प्रामाणिक असलेला कार्यकर्ता कधीच बळी पडणार नाही. पण आर्थिक स्वार्थासाठी पक्ष सोडून गेलेल्या गद्दारांना आणि पैशाच्या जीवावर राजकारण करू पाहणाऱ्यांना तालुक्यातली जनता कधीच माफ करणार नाही असे सडेतोड प्रतिपादन व इशारा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी दिला आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी गेवराई विधानसभा मतदारसंघातील दररोज एका जिल्हा परिषद सर्कलला भेट देऊन आपला झंजावती दौरा सुरू केला आहे. सरकारमधील शिवसैनिक आणि पदाधिकारी यांच्यासह ग्रामस्थांच्या भेटी घेऊन ते संवाद साधत असल्याने त्यांना तालुकाभरात सामान्य जनता भरभरून प्रतिसाद देत असल्याचे पाहायला मिळत आहे. याच पार्श्वभूमीवर दिनांक २८ ऑगस्ट २०२४ रोजी उमापूर येथे झालेल्या शिव संपर्क मेळाव्यात बदामराव पंडित बोलत होते. याप्रसंगी जिल्हा परिषद चे माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित, युवानेते रोहित पंडित, गोविंदराव आहेर, माजी सभापती पंढरीनाथ लगड, माजी पं स सदस्य अजय औटी, महादेव औटी, गुलमेश्वर कारखान्याचे चेअरमन पवन बापूराव चव्हाण, तय्यबभाई पठाण, सरपंच शेख शामद भाई, सरपंच संभाजीराव आहेर, निवृत्ती गोरडे, डॉ भैय्यासाहेब पवार, काशिनाथ चव्हाण, रामदास मुकादम, छगनराव चेडे, सखाराम चेडे, गुलामभाई कुरेशी, लक्ष्मण मोरे, मधुकर आहेर आदींची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना बदामराव पंडित म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अमरसिंह पंडित यांनी जय भवानी साखर कारखान्याच्या माध्यमातून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्रास देण्याचेच नेहमी काम केले. त्यासोबत बाजार समितीच्या माध्यमातून कापूस आणि तूर खरेदीमध्येही शेतकऱ्यांना त्रास दिला. यासोबतच संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना, घरकुल आणि विहिर योजना आदी योजनाही जाणीवपूर्वक अडवण्याचे काम केले. हे तालुक्यातील जनता कधीच विसरणार नाही. उसाच्या ◀◀ पान ३ वर



उमापुरात शिवसैनिकांच्या एकीची वज्रमुठ

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाशी सुसंगत बाबी लागू करण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न प्रशंसनीय- राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

**पुणे । प्रतिनिधी**

संशोधन चलित शिक्षण, आंतरविद्याशाखीय शिक्षण आणि शैक्षणिक बाबींसाठी उद्योगांसमवेत सहयोग या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाशी सुसंगत बाबी लागू करण्याचा सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाचा प्रयत्न प्रशंसनीय आहे, असे गौरवोद्गार राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी काढले.

सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाच्या पहिल्या पदवीप्रदान समारंभात राज्यपाल बोलत होते. यावेळी विद्यापीठाच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष डॉ. प्रमोद चौधरी, कुलगुरू प्रा. सुनील भिरुड, कुलसचिव डॉ. दयाराम सोनवणे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालक डॉ. यशोधरा हरिभक्त आदी उपस्थित होते.

सीओईपी ही संस्था शैक्षणिक उत्कृष्टतेची दीपस्तंभ असून संस्थेच्या पहिल्या पदवीदान समारंभास उपस्थित राहताना आनंद होत असल्याचे सांगून राज्यपाल श्री. राधाकृष्णन म्हणाले, 'पूर्वेकडील ऑक्सफर्ड' आणि राज्याची सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळखले जाणारे पुणे शहर दीर्घकाळापासून शिक्षणाचे माहेरघर आणि सांस्कृतिक पुनर्जागरणाचे केंद्र आहे. ही संस्था केवळ शहरच नव्हे तर संपूर्ण राज्य आणि संपूर्ण देशात तंत्रज्ञानातील नवकल्पना आणि शैक्षणिक विद्वत्तेचे केंद्र म्हणून आपली एक वेगळी प्रतिष्ठा जपत असताना भरभराट करत आहे. तांत्रिक प्रगती, शैक्षणिक, संशोधन आणि विशेषत: महिला सक्षमीकरणाच्या क्षेत्रात सीओईपीने मोठी प्रगती केली आहे. महिला सक्षमीकरणासाठी विद्यापीठाची दृढ वचनबद्धता उल्लेखनीय आज पदवी मिळविणाऱ्या मुलींच्या मोठ्या संख्येतून दिसून येते. पदवीदान समारंभातील दीक्षांत मिरवणुकीचे नेतृत्व एक महिला करत असल्याचे पाहून विद्वान, नेतृत्व आणि बदल घडवणाऱ्या म्हणून स्वत:ची भरभराट करू शकतील अशा महिलांसाठी सर्वसमावेशक वातावरणास प्रोत्साहन देण्याची विद्यापीठाची समर्पण भावना दिसून येते, असेही राज्यपाल म्हणाले. ते पुढे बोलताना म्हणाले, 'स्टडी इन इंडिया' उपक्रमाच्या माध्यमातून भारतातील विविध राज्ये तसेच जगभरातील देशांतील विद्यार्थ्यांचे स्वागत करून विविधतेला चालना देण्याचे विद्यापीठाचे प्रयत्न विशेष मान्यता मिळण्यासाठी पात्र आहेत. ही समृद्ध विविधता केवळ विद्यार्थ्यांचा शैक्षणिक अनुभवच वाढवत नाही तर त्यांना जागतिक नागरिक बनण्यासाठी, सीमांचे बंधन तोडून आव्हानांना तोंड देण्यासाठी सज्ज करते. सीओईपी सारख्या संस्थांद्वारेच आपण एक स्वावलंबी भारत घडवू, जिथे ज्ञान आणि कौशल्य विकास हातात हात घालून चालेल, आपल्या तरुणांना प्रगती आणि परिवर्तनाचे अग्रदूत होण्यासाठी सक्षम करेल, असे प्रतिपादनही त्यांनी केले. आदिवासी विद्यापीठ स्थापन करण्याच्या अनुषंगाने माहिती देताना राज्यपाल म्हणाले, या विद्यापीठाचा उद्देश हा आदिवासींना केवळ आदिवासी म्हणून ठेवण्याचा नव्हे तर त्यांच्यात जगाशी स्पर्धा करण्याची क्षमता निर्माण करणे हा असावा.





## सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाचा पहिला पदवीप्रदान समारंभ संपन्न

आपल्या देशाची अर्थव्यवस्था सध्या जगात पाचव्या क्रमांकाची असून २०४७ पर्यंत जगात तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था व्हावी यासाठी प्रयत्न आहेत. त्यासाठी आपल्यासारख्या प्रशिक्षित आणि उच्चशिक्षित विद्यार्थ्यांकडून खूप अपेक्षा असून विकसीत भारत घडविण्याच्या प्रक्रियेत तुम्ही नक्कीच योगदान द्याल, असा विश्वासही राज्यपालांनी यावेळी व्यक्त केला

देशभरातील शिक्षण पद्धतीत अमूलाग्र सुधारणांच्या दृष्टीने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी) २०२० ला प्रतिसाद मिळत आहे. आज जग गतीने बदलत असताना आपल्याला एकच अभ्यासक्रम वर्षानुवर्षे चालू ठेवता येणार नाही. बाजारपेठेतील गरजा, मागणीशी सुसंगता असणारा अभ्यासक्रम असणे आवश्यक आहे. लेखी अभ्यासक्रम (थिअरी) आणि प्रात्यक्षिक यांच्यात अत्यंत जवळचा समन्वय गरजेचा आहे. वेगवेगळ्या विषयांची आवड असलेल्या विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या विद्याशाखांचा अभ्यासक्रम शिकता येणे आवश्यक आहे, असेही राज्यपाल म्हणाले.

शिक्षण, नवनिर्मिती आणि सांस्कृतिक विकासात महाराष्ट्र नेहमीच अग्रेसर राहिला आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या व्यावसायिक जीवन प्रवासाला सुरुवात करत असताना, या राज्याचा वारसा पुढे नेण्यासाठी त्याच्या विकासात आणि समृद्धीसाठी हातभार लावावा, अशी अपेक्षाही राज्यपालांनी व्यक्त केली.

भारत जगातील सर्वात तरुण राष्ट्र म्हणून उदयास आला असून ही आपली सर्वात मोठी ताकद आहे. ही ताकद जागतिक नेता बनण्याची आपली क्षमता वाढविते. तथापि, देशासमोर दारिद्र्य, बेरोजगारी, ऊर्जा, पाणीटंचाई आणि सुरक्षितता अशी आव्हानेही असून त्यावर मात करण्यासाठी नावीन्य, संशोधन, उद्यमशीलता आदी सर्वांचा वापर करणे आवश्यक आहे.देशांतर्गत समस्यांवर लक्ष केंद्रित करताना आपण केवळ देशाचे नव्हे तर जगाचे नागरिक असल्याचे लक्षात ठेवणे आवश्यक आहे. आपल्या भविष्यातील पिढ्यांसाठी जगाचे नागरिक या नात्याने जागतिक स्तरावर भेडसावणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी कार्य करणे अत्यावश्यक आहे. यावेळी डॉ.प्रमोद चौधरी म्हणाले, सीओईपीला एक दीर्घ परंपरा लाभली असून विशिष्ट नितीमूल्यांवर विद्यार्थी घडवले जातात. तांत्रिक कुशलतेसोबतच येथे शिकणारा विद्यार्थी भारताचा उद्याचा जबाबदार नागरिकही होईल, यादृष्टीने त्याची जडण-घडण केली जाते. समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी सीओईपीच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर योगदान दिले आहे.यावेळी कुलगुरू डॉ. सुनिल भिरूड यांनी सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाच्या भविष्यकालीन उपक्रमांबाबत माहिती देऊन विद्यापीठ अहवालाचे वाचन केले. माहिती देताना ते म्हणाले, आजच्या पदवीदान समारंभात विद्यापीठातील २४६ पदव्युत्तर विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात येत असून विविध विद्याशाखांमध्ये प्रथम क्रमांकाची कामगिरी करणाऱ्या १२ विद्यार्थ्यांना रँक प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात येत आहे. याशिवाय ७७७ पदवीधर विद्यार्थ्यांना उत्तीर्ण प्रमाणपत्रे, उत्कृष्ट कामगिरीसाठी ९ पदवीधर विद्यार्थांना सुवर्ण पदके प्रदान करण्यात येत आहेत. कार्यक्रमास विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

# शिवकालीन विहीर संवर्धनासाठी ग्रामस्थ सरसावले

**पुणे । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ, छत्रपती संभाजी महाराज यांच्या शौर्याचा जिवंत वारसा लाभलेल्या मोसे खोरे मावळातील कादवे (ता. राजगड) गावातील शिर्केवाडी येथील दुर्लक्षित शिवकालीन विहिरीच्या संवर्धनासाठी स्थानिक ग्रामस्थ सरसावले आहेत.

ग्रामस्थ व कादवे ग्रामपंचायतीच्या पुढाकाराने या शिवकालीन विहिरीची नोंद राज्य शासनाच्या पुरातत्व विभागाने 'असंरक्षित स्मारक' म्हणून नुकतीच केली आहे. कादवेचे सरपंच संतोष बिरामणे, उपसरपंच सुरेश जागडे, ग्रामपंचायत सदस्य नवनाथ शिर्के, युवक कार्यकर्ते विनोद बिरामणे आदींनी विहिरीच्या संवर्धनासाठी पुढाकार घेतला आहे. या विहिरीची नोंद कोठेही नाही. मात्र, या जागेचा ७/१२ उतारा आहे. त्यामुळे कादवे ग्रामपंचायतीने शिवकालीन विहिरीची नोंद होऊन जतन करण्याचा ठराव पुरातत्व विभागाला दिला होता. त्यानंतर पुरातत्व विभागाने 'असंरक्षित स्मारक' म्हणून विहिरीची नोंद केली. कादवेपासून १२ किलोमीटर अंतरावर शिरकोली (ता. राजगड) येथे शिवकालीन श्री शिरकाईदेवी मंदिर आहे. शिर्के घराण्याचे कुलदैवत म्हणून श्री शिरकाई देवस्थानची ओळख आहे. वाटसरू, भाविकांच्या सोयीसाठी शिवकाळात शर्केवाडी येथे ही विहीर बांधली असावी, असे ज्येष्ठ इतिहास अभ्यासक दत्ताजी नलावडे यांनी सांगितले.

# ब्राह्मण सभेच्यावतीने संत ज्ञानेश्वर महाराजांची जयंती उत्साहात साजरी

**पिंपरी । प्रतिनिधी**

कधी ऊन तर कधी सावली, सोबत रिमझिम पाऊसधारा निसर्गातील या आल्हाददायक वातावरणाशी साधर्म्य साधत भाव भक्तीपरं गीतांच्या स्वरधारांची अनोखी अनुभूती उपस्थितांना मिळाली. निमित्त होते संत ज्ञानेश्वर महाराज जयंतीचे. पिंपळे सौदागर परिसरातील श्री संत ज्ञानेश्वर ब्राह्मण सभेच्या वतीने सोमवार दि. २६ रोजी सायंकाळी मोठ्या उत्साहात ज्ञानोबा माऊलीची जयंती साजरी करण्यात आली.



कुणाल आयकॉन रोडवरील बाळासाहेब कुंजीर क्रिडांगणावर विलास जोशी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाचा प्रारंभ हेमलता गोडबोले, निलिमा कुलकर्णी, अलका मुळे, सुजाता अपराजित यांनी सादर केलेल्या हरिपाठाने करण्यात आला. त्यानंतर ज्येष्ठ नागरिक चारुहास शुक्ल यांच्या हस्ते ज्ञानेश्वर माऊलीच्या मुर्तीचे पूजन करण्यात आले. शशिकांत कुलकर्णी, प्रकाश मोदी, स्नेहा चिंचवडकर, वासंती जोशी, वृषाली चांदोरकर, संध्या माशाळकर आदिंनी भक्तीगीते सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन रमेश भट यांनी केले. पसायदान आणि राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्रीनाथ जोशी, राजेंद्र तिखे -कुलकर्णी, दिनेश कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले.

# देवेंद्र फडणवीस नेहमी प्रमाणे खोट बोलत आहेत

**पुणे । प्रतिनिधी**

पुतळा जर इंडियन नेव्हीने उभा केलेला होता तर ,मग नेव्हीचे दोन डिझाईन डावलून जयदिप आपटेचे तिसरे डिझाईन अचानक का स्विकारण्यात आले ? तसेच,आपटेला अशा प्रकारच्या मोठ्या कामाचा अनुभव नसताना आणि राज्यामध्ये अन्य मोठे शिल्पकार असताना हे काम आपटेला कोणत्या निकषावर देण्यात आले ? आणि जर हा पुतळा नेव्हीने उभारलेला होता तर , त्यावर राज्य सरकारने खर्च कशासाठी केला होता ? आणि पुतळा पडल्यानंतर राज्य सरकारने इंजिनियर चेतन पाटील याच्यावर गुन्हा कसा काय दाखल केला ? वार्याची दिशा नेमकी शिल्पकाराला कळली नाही का नेव्हीला ?

देवेंद्र फडणवीस यांना वाटतयं त्यांच्या सारखा शहाणा माणून राज्यात दुसरा कोणी नाहीच.परंतु,घटना घडल्यानंतर गुन्हा दाखल झाल्यानंतर यांच्या गृहमंत्रालयाच्या अधिकारातील पोलीस यंत्रणेच्या नाकाखालून शिल्पकार जयदिप आपटे फरार कसा काय झालाय ? गृहमंत्री देवेंद्र फडणवीसांना या सगळ्या प्रश्नांची उत्तरे राज्यातील जनतेला द्यावीच लागणार आहेत.

# गणेश मूर्ती बनवणे कार्यशाळेचे आयोजन

**पिंपरी । प्रतिनिधी**

चिंचवड येथील एआयसीटी डिझाईन अकादमीच्या वतीने मोफत गणेश मूर्ती बनविण्याची कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संचालिका लीना सप्रा यांनी दिली आहे.




ही कार्यशाळा एआयसीटी डिझाईन अकादमी, बहिरवडे प्लाझा , ३ रा मजला, जनता बँकेच्यावर, निरामय हॉस्पिटल रोड, चिंचवड स्टेशन येथे दि ३१ ऑगस्ट आणि १ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी १:०० ते ४:०० या वेळेतहोईल. ही कार्यशाळा सर्वांसाठी विनामूल्य खुली आहे. या माध्यमातून पर्यावरणपूरक गणेश मूर्ती बनवण्याची कला शिकण्याची उत्तम संधी उपलब्ध देत आहोत .या उपक्रमाचा उद्देश पर्यावरणपूरक मूर्ती बनवण्याचे महत्त्व जनतेला पटवून देणे आहे, जेणेकरून आपल्या सणांच्या उत्सवामुळे पर्यावरणाला कोणत्याही प्रकारची हानी होणार नाही. सहभागी होणाऱ्यांना कुशल कलाकारांच्या मार्गदर्शनाखाली सुंदर, शाश्वत आणि विसर्जनासाठी सुरक्षित गणेश मूर्ती बनवण्याचे प्रशिक्षण दिले जाईल.

सहभाग इच्छुक व्यक्तींनी ३० ऑगस्ट २०२४ पूर्वी नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणी अनिवार्य आहे आणि खाली दिलेल्या ठठ कोडद्वारे किंवा ९३२२३८४८६२ वर व्हाट्सअप करून नोंदणी करण्याचे आवाहन केले आहे.

# शिवाजीनगर येथे पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन-जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे

**पुणे । प्रतिनिधी**

कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग पुणे आणि समर्थ युवा फाऊंडेशन स्किल स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, ३१ ऑगस्ट रोजी प्रोगेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे मॉर्डन महाविद्यालय छत्रपती शिवाजीनगर येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे सकाळी ९ वाजता आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिली आहे.

या रोजगार मेळाव्यात जिल्ह्यातील औद्योगिक परिसरातील विविध १०० पेक्षा अधिक नामांकित उद्योजकांनी सहभाग दर्शविलेला असून त्यांच्याकडून ९ हजारापेक्षा अधिक रिक्तपदे कळविण्यात आलेली आहेत. ही रिक्तपदे किमान १० वी, १२ वी, पदवीधर, कोणत्याही शाखेचा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा अभ्यासक्रम (आयटीआय) पूर्ण केलेला, पदविकाधारक, शिकाऊ अभियंता (ट्रेनी इंजिनिअर) अशा विविध पात्रताधारक उमेदवारांतून भरण्यात येणार असून नोकरीइच्छुक उमेदवारांना नोकरीच्या विविध संधी उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

या मेळाव्यात मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा लाभ घेण्यास इच्छुक उमेदवारांनीदेखील सहभाग नोंदवावा. स्वयंरोजगाराबाबत माहिती व मार्गदर्शनाकरीता शासनाची विविध कर्ज देणारी महामंडळे, सारथी, बार्टी, अमृत, जिल्हा उद्योग केंद्राच्या योजनासंबधीत दालने तसेच सीईओपीचे भाऊ इन्स्टिट्यूट, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय, द टोमोटिव्ह रिसर्च असोशिएसन ऑफ इंडिया (एआरएआय), स्मार्ट, मॅग्नेट प्रकल्प, नांदी व देअसरा फांऊडेशन, डॉ. रेड्डीज फौंडेशन, जन शिक्षण संस्था, लाईट हाऊस, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे रिसर्च पार्क फौंडेशन, एनएसडीसी इंटरनॅशनल अशा शासकीय, खासगी व सेवाभावी संस्थांचे स्टॉलही असणार आहेत.

नोकरी इच्छुक उमेदवारांनी रिक्तपदांबाबत अधिक माहितीसाठी विभागाच्या हींींि:// ॄ.ीक्षसरी.ारहरीुूरा.सेीं.ळप या संकेतस्थळाला भेट देऊन आपले पसंतीक्रम ऑनलाईन पद्धतीने नोंदवावेत. रोजगार मेळाव्याच्या दिवशी थेट मुलाखतीस येताना आपली सर्व शैक्षणिक कागदपत्रे, पारपत्र आकाराची छायाचित्रे, आवश्यकतेनुसार अर्ज, बँक पासबुक, आधारकार्डाच्या आदींच्या छायांकित प्रती सोबत आणाव्यात.

जिल्ह्यातील अधिकाधिक उमेदवारांनी प्रोगेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे मॉर्डन महाविद्यालय, शिवाजीनगर येथे उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, ४८१ रास्ता पेठ, सरदार मुदलीयार रोड, पुणे-११ येथे प्रत्यक्ष अथवा ०२०-२६१३३६०६ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. दिवसे यांनी केले आह

# सर्जनशीलतेला वाव म्हणजे 'वार्षिक अंक'-प्रो. (डॉ.) प्रभाकर देसाई

**पिंपरी । प्रतिनिधी**

महाविद्यालयातील तरुणांनी सजग राहिले पाहिजे. स्पर्धेच्या या युगात आपण सक्षम बणून काळाची आव्हाने पेलण्यासाठी सज्ज राहिले पाहिजे. मोबाईलचा अतिवापर टाळून वाचन संस्कृतीवर भर दिला पाहिजे. समाजजीवन, समाजजीवनातील स्थित्यंतरे समजून घेऊन आपणास अभिव्यक्त होता आले पाहिजे. महाविद्यालयीन जीवनात महाविद्यालयातून दरवर्षी प्रकाशित होणारा वार्षिक अंक आपल्या सर्जनशीलतेला, नवनिर्मितीला वाव मिळवून देणारे असे महत्त्वपूर्ण माध्यम आहे, त्याचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा व आपल्या विचाराला चालना द्यावी



असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आंतरविद्याशाखा अधिष्ठाता प्रो. (डॉ.) प्रभाकर देसाई यांनी केले. पुढे ते म्हणाले की, पारंपरिक शिक्षणात बदल होऊन नवीन शैक्षणिक धोरण आले आहे. या धोरणात अध्ययनात विशिष्ट शाखेचे पारंपरिक बंधन असणार नाही. एकाच वेळी आपण ज्या शाखेत प्रवेश घेतलेला आहे त्यासोबत दुसऱ्या शाखेतील आपल्या आवडीचा विषय घेऊन आपणास अध्ययन करता येणार आहे, त्याचा लाभ घ्यावा. रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले महाविद्यालयामार्फत प्रकाशित होणाऱ्या 'शाल्मली' वार्षिक अंकाच्या प्रकाशन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी उपप्राचार्य प्रा. शहाजी मोरे होते. महाविद्यालयाचा 'वार्षिक अंक' हा विद्यार्थ्यांना व्यक्त होण्याचे हक्काचे व्यासपीठ आहे, त्यातून अधिकाधिक विद्यार्थ्यांनी व्यक्त व्हावे असे आवाहन त्यांनी केले.

वार्षिक अंकातून कथा, कविता, निबंध, वैचारिक लेखन,व्यक्तिचित्रे, नवनवे शास्त्रीय शोध, राजकारण, अर्थकारण, शिक्षण, संस्कृती अशा विविध पातळ्यांवरील लेखन समाविष्ट केले जाते. विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या विषयावर लेखन करून आपल्या विचारायला चालना द्यावी असा मनोदय प्राचार्य प्रो. (डॉ.) माधव सरोदे यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संपादक डॉ. वैशाली खेडकर यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा. स्वप्ना हजारे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रो. (डॉ.) कामायनी सुर्वे यांनी केले. कार्यक्रमास प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# पोलिस कर्मचारी अनुष्काचा अद्याप शोध नाही

**पुणे । प्रतिनिधी**

मानसिक तणावाखाली असलेल्या पोलिस कर्मचारी अनुष्का सुहास केदार (वय २०, रा. लक्ष्मीनारायणनगर, दिघी) यांनी इंद्रायणी नदीच्या पुरात उडी मारत आत्महत्या करण्याचा प्रयत्न रविवारी (दि. २५) केला. मात्र, अद्याप तिचा शोध लागलेला नाही. रविवारी सायंकाळी पाचच्या सुमारास अनुष्काने इंद्रायणी नदीत उडी मारल्याचे घाटावर तैनात असलेल्या पोलिसांनी पाहिले. त्यांनी तिला वाचविण्याचा प्रयत्न देखील केला. मात्र, ती अद्याप मिळू शकलेल्या नाही. इंद्रायणी नदी घाट, चर्होली नदी घाट, धानोरे नदी घाट तसेच तुळापूर येथील भीमा-भामा संगम ते पुणे ग्रामीण पोलिस हद्दीत येणार्या उजनी धरणपर्यंतच्याजात असल्याचे आळंदी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक भीमा नरके यांनी



सांगितले. मंगळवारी सकाळपासून पुन्हा आळंदी पोलिस, नगरपरिषद, एनडीआरएफ, रेस्क्यू टीमद्वारे तिचा इंद्रायणी नदीपात्रात शोध सुरू होता. मात्र, तिला शोधण्यात अपयश आले. बुधवारी देखील शोधकार्य सुरू ठेवण्यात येणार असल्याचे आळंदी पोलिसांनी सांगितले. नदीपात्रात व मावळ घाटमाथ्यावर संततदार पाऊस आणि हजेरी लावल्यामुळे इंद्रायणीच्या पाणीपातळीत झपाटच्याने वाढ होत आहे. यामुळे शोधकार्यात अडचणी येत आहेत. एनडीआरएफकडील ३० जवान व ४ बोटींद्वारे इंद्रायणी घाट आळंदी येथे शोध सुरू आहे. तर, नगरपरिषदेकडील १ बोट व ६ जवान चर्होली खुर्द, चर्होली बुद्रुक, बायपास या ठिकाणी शोध घेत आहेत. आपत्ती व्यवस्थापन संघाकडील ११ जवान सोळू, वडगाव, गोलेगाव व इंद्रायणीच्या पात्रामध्ये शोध घेत आहेत. तरस आळंदी पोलिसांचे पथक इंद्रायणी नदीच्या दोन्ही बाजूने शोध घेत आहेत.